कृषीवल

रायगड, रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

## मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार!

**बोरोबेकरा :** मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. शनिवारी जिरीबाम जिल्ह्यातील एका गावावर अतिरेक्यांनी हल्ला केला. त्यानंतर याठिकाणी हिंसाचार उसळला. यासंदर्भात एका अधिकाऱ्याने सांगितले की, अतिरेक्यांनी पहाटे ५ वाजता बोरोबेकरा पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या एका गावाला आधुनिक शस्त्रांनी लक्ष्य केले. अतिरेक्यांनी बॉम्बस्फोटही केले. यादरम्यान केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रत्युत्तर दिले आणि दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार झाला. याचबरोबर, घटनास्थळी अतिरिक्त सुरक्षा दल पाठवण्यात येत असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी पान २ वर

## चेंबूरमधील मंदिरात भीषण आग

**मुंबई:** चेंबूर कॉलनी परिसरातील संतोषी माता मंदिरात शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या चार गाड्या दाखल झाल्या असून आग्निशामक आग विझविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. चेंबूर कॉलनी परिसरातील एनलक्स रुग्णालयाच्या शेजारी हे मंदिर असून शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास मंदिरात अचानक आग लागली. यावेळी मंदिरात अनेक भाविक उपस्थित होते. आग लागताच भाविकांनी मंदिराबाहेर धाव घेतली. तसेच आगीची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. त्यानंतर तात्काळ अग्निशमन दलाच्या पान २ वर

# ‘लाडक्या बहिणीं’ची दिवाळी अंधारात

### सरकारने योजनेचा निधी थांबवला; नवे अर्जही स्वीकारणे बंद




। रायगड । प्रतिनिधी ।

महायुती सरकारची लाडकी बहीण योजना आचारसंहितेच्या कचाट्यात सापडली आहे. लाडकी बहीण योजनेला केंद्रीय निवडणूक आयोगाची स्थगिती मिळाली आहे. या योजनेअंतर्गत नवे अर्ज स्वीकारण्यावर बंधने आणली आहेत. यामुळे पात्र महिलांना पुढचे हप्ते मिळू शकणार नाहीत आणि नव्याने प्रस्ताव करणाऱ्या महिलांना नोंदणी करता येणार नाही. यामुळे लाडक्या बहिणींना दिवाळी अंधारात करावी लागणार आहे.

रायगड जिल्ह्यात १ लाख ११ हजार महिलांचे आधार प्रमाणीकरण होत नसल्याने महिला लाडकी बहिण योजनेपासून वंचित राहिल्या होत्या. वंचित राहिलेल्या ४५ हजार महिलांच्या खात्यांना आधार जोडणी करण्यात बँकांना यश आले. मात्र आधार जोडणी अभावी अजूनही ६६ हजार महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या होत्या. यामुळे विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीच्या उमेदवारांना बहिणीच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पहिल्या टप्प्यासाठी १ लाख ८१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. दुसऱ्या टप्प्यात १ लाख ६८ हजार प्राप्त झाले. अशा प्रकारे एकूण ३ लाख ४९ हजार महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली आहे. सुरूवातीला २६ हजार अर्जांमध्ये त्रूटी आढळून आल्या होत्या. ८१८ अर्ज बाद ठरले होते. ज्या खात्यांना आधार जोडणी झालेली नाही अशा खात्यांवर योजनेच्या लाभाची रक्कम जमाच होऊ शकलेली नाही.जिल्ह्यातील १ लाख ११ हजार महिलांचे अर्ज आधार लिंकेज अथवा सिडींग नसल्याने, लाडकी बहीण योजनेच्या मंजुरीसाठी प्रलंबित राहिले होते. ६६ हजार खात्यांचे आधार जोडणी अद्याप शिल्लक आहे. त्यामुळे या ६६ हजार महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही.लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करणाऱ्या महिलांच्या पान २ वर

# दळवींच्या आमदारकीची ‘वाट’

- अलिबाग-रोहा-मुरूडमधील रस्त्यांना खड्डे
- मतपेटीतून मतदार व्यक्त करणार संताप




। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा तसेच अलिबाग-रेवदंडा-मुरूड मार्गावरील रस्ते चांगले होतील, या विश्वासाने मतदारांनी आ.दळवींना निवडून दिले. परंतु त्यांनी मतदारांची घोर निराशा केली आहे. अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा मार्गावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. धुळीचा प्रचंड त्रास प्रवाशांना होत आहे. परिणामी, गेल्या पाच वर्षात केवळ आश्वासनांची उधळण करणाऱ्या आ. दळवींना आमदारकीची वाट बिकट असून त्याचा फटका यानिवडणुकीत बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

निवडून आल्यावर स्वतःच्या खर्चातून रस्त्याचे काम करेन, असे आश्वासन आमदार महेंद्र दळवी यांनी मते मिळविण्यासाठी दिले होते. निवडून आल्यावर मोठा गाजावाजा करीत अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले. अनेकवेळा नारळ वाढविण्याचा कार्यक्रम राबविला. परंतु आजही अलिबाग-रोहा तसेच अलिबाग-रेवदंडा मार्गावरील प्रवासी खड्ड्यातून प्रवास करीत आहेत. रस्त्यावर पान २ वर

## सागरी जलधी क्षेत्रात घुसखोरी

। मालवण । प्रतिनिधी ।

सागरी किनारपट्टीवरील मालवण, तारकर्लीसमोर महाराष्ट्र राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात घुसखोरी करून अवैध मासेमारी करणाऱ्या कर्नाटक मलपी येथील हायस्पीड ट्रॉलर मत्स्य विभागाने शनिवारी पहाटे कारवाई करत ताब्यात घेतला आहे. पापलेट, सौदाळा, बांगडा, सुरमई, कट्टर, बळा, कटल यांसह अन्य मासे ट्रॉलरमध्ये मोठ्या प्रमाणात असून त्याचा पंचनामा करून पुढील कारवाईसाठी हायस्पीड ट्रॉलर सर्जेकोट जेट्टी येथे आणण्यात आला आहे.

मत्स्य विभागाचे परवाना अधिकारी मुरारी भालेकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, पान २ वर






# बंदरांची २५ कोटींची उलाढाल ठप्प

## वादळसदृश्य परिस्थितीचा फटका; नौका बंदरात उभ्या, मासळीचा दुष्काळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**वादळसदृश परिस्थितीमुळे रायगड जिल्ह्यातील रेवस, करंजा, बोडणी, नवगाव, वरसोली, अलिबाग, आक्षी, थेरोंडा, आग्राव, कोर्लई, मझगाव, एकदरा, राजपुरी, दिवेआगर, श्रीवर्धन या बंदरातील मच्छिमारीला ब्रेक लागला असून, तीन हजार नौका बंदरातच उभ्या आहेत. त्यामुळे मासेमारी व्यवसायच ठप्प झाला असून, सुमारे २५ कोटी रुपयांचे नुकसान मच्छिमारांना सोसावे लागले आहे. तसेच काही नौकांनी खाडीचा आधार घेतला आहे.**



कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे कोकण किनारपट्टीवर मागील आठवडाभर वादळसदृश परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे अधूनमधून वेगवान वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू आहे. त्याचा फटका मच्छिमारीला बसला आहे. यंदा मासेमारी हंगामाच्या सुरवातीला खराब वातावरणाचा मासेमारीला फटका बसला. ५ ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाली. जेमतेम दोनच आठवडे मासेमारी करता आली. पुन्हा वादळाने तोंड वर काढले. २३ ऑगस्टला सुरू झालेल्या वादळी वातावरणामुळे पुढे ८ दिवस परिस्थिती बिकट होती. गणेशोत्सवावेळी पंधरा दिवस मासेमारी बंद ठेवल्यामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले होते. पुढे महिन्याभरातच ऑक्टोबर महिन्यात वादळाने तोंड वर काढले. गेले आठ दिवस पुन्हा वादळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मच्छिमार नौका खोल समुद्रात नेण्यास तयार नाहीत. त्यामुळे सध्या मासळीचा दुष्काळ पाहायला मिळत आहे.

> **गेले आठ दिवस सुरू असलेल्या वादळी वाऱ्यामुळे खाडीत नौका नांगर टाकून उभ्याच ठेवल्या आहेत. आज काहीजण मासेमारीला रवाना झाले; मात्र वाऱ्यामुळे मोठी अडचण झाली आहे तसेच दक्षिणेकडच्या वाऱ्यामुळे मासळीच मिळत नाही. त्यामुळे मच्छिमार हवालदिल झाले आहेत. सध्या मासळीचा तुटवडा भासत आहे. होणारा खर्च कसा झेपवायचा, असा प्रश्न पडला आहे. आतापर्यंतचा संपूर्ण हंगाम खूपच वाईट गेला आहे.**
> **– सुजित पाटील, मच्छिमार**

# शेतकऱ्यांना दाखविण्यात आले शेणखत निर्मितीचे प्रात्यक्षिक

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील खांब येथे शेतीसाठी उपयुक्त ठरत असलेल्या शेणखत निर्मितीचे प्रात्यक्षिक कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्र रोहा मार्फत आणि कृषी महाविद्यालय, दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या ''कृषी संजीवनी'' गटातील कृषी दुतांनी शेणखत निर्मितीचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना करून दाखविण्यात आले.

या प्रात्यक्षिक कार्यक्रम प्रसंगी मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. तर याबाबत माहिती सांगताना फार्मर यार्ड मॅन्युअर म्हणजेच शेतकऱ्यांच्या आवारातील खत. फार्मर यार्ड मॅन्युअरचा उत्पादन प्रक्रियेत, जैविक पदार्थांचा वापर करून पोषक तत्वांची साठवण केली जाते. फार्मर यार्ड मॅन्युअर मातीमध्ये घालणे फायद्याचे असते. कारण यामुळे मातीची गुणवत्ता, जलधारण क्षमता आणि पोषणमूल्य वाढते. हे मातीतील सूक्ष्मजीवांची वाढ उत्तेजित करते. ज्यामुळे मातीची उपजाऊपणा वाढतो. अशाप्रकारची माहिती कृषीदूतांनी यावेळी दिली.



या प्रत्याक्षिकासाठी डॉ.अहिरे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. मनोज तलाठी, डॉ. जीवन आरेकर यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ५ दिवस

**। रायगड । वार्ताहर ।**

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सातपैकी पाच दिवस तर अर्ज माघारीसाठी पाचपैकी दोन दिवसांचाच अवधी मिळणार आहे. ३१ ऑक्टोबरला नरक चतुर्थी असून त्यादिवशी जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारातील सुट्टी असणार आहे. पण, त्या दिवशी उमेदवारांना अर्ज माघार घेता येणार आहेत.

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन चार दिवस झाले, तरीदेखील अद्याप ना महायुती ना महाविकास आघाडीतील पक्षाकडून उमेदवारांची एकही यादी जाहीर झालेली नाही. सर्वच पक्षांकडून बंडखोरी होणार नाही, याची खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे उमेदवारांची यादी कधीपर्यंत जाहीर होणार आणि त्या उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी किती दिवस मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**प्रशासनाची तयारी पूर्ण**

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून प्रशासनाची संपूर्ण तयारी झाली आहे. इच्छुक उमेदवारांना २२ ते २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. त्यात शनिवार व रविवारी सुट्टी असणार आहे. उमेदवारांना अर्ज माघारीसाठी ३१ ऑक्टोबर व ४ नोव्हेंबर हे दोन दिवस मिळतील.असे रायगडचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

### विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम

**उमेदवारी अर्ज दाखल : २२ ते २९ ऑक्टोबर (शनिवार, रविवार सुट्टी)**
**अर्जांची छाननी व अंतिम यादी : ३० ऑक्टोबर**
**अर्ज माघार : ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर (१ ते ३ नोव्हेंबरपर्यंत दिवाळी सुट्टी)**
**प्रचार कालावधी : ५ ते १८ नोव्हेंबर**
**मतदान : २० नोव्हेंबर**
**मतमोजणी : २३ नोव्हेंबर.**

# घरासाठी अर्जांचा पाऊस

**रायगड :** म्हाडाच्या मुंबई मंडळाने कोकण मंडळातील १२ हजारहून अधिक घरांसाठी काढलेल्या सोडतीत ऑनलाइन अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या आठ दिवसांत ४,७०१ जणांनी सोडतीत अर्ज केला आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या योजनेसाठी ३,४०० अर्ज आले आहेत. म्हाडाच्या कोकण मंडळाने ठाणे शहर, कल्याण, टिटवाळा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गातील १२ हजार ६२६ घरांसाठी इच्छुकांकडून अर्ज मागवले आहेत. यामध्ये लॉटरीच्या माध्यमातून विक्री केल्या जाणाऱ्या १,४३९ घरांसाठी तसेच प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या माध्यमातून ११ हजार १८७ घरे विकली जाणार आहेत.

# पाचवी, आठवीची ९ फेब्रुवारीला शिष्यवृत्ती परीक्षा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शासनमान्य शाळांमधून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा व शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेत प्रविष्ट होण्यासाठी व इयत्ता आठवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करता येणार आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा ९ फेब्रुवारी रोजी होईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केले आहे.

परीक्षेला पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाचे असणार आहेत. प्रत्येक पेपरसाठी ए, बी, सी व डी अशा विविध संचांच्या प्रश्नपत्रिका असणार आहेत. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी (इयत्ता पाचवी) उत्तरांच्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय अचूक असणे जरुरी आहे. तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठीच्या (इयत्ता आठवी) प्रत्येक पेपरमध्ये कमाल २० टक्के प्रश्नांच्या बाबतीत उत्तरांच्या चारपैकी दोन पर्याय अचूक असावेत. ते दोन्ही पर्याय विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक असणार आहे. मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, तेलुगु व कन्नड या सातपैकी कोणत्याही एका माध्यमातून विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना www.mscepune.in व http://puppssmsce.in या संकेतस्थळावरून विलंब शुल्कासह १५ डिसेंबरपर्यंत तर २३ डिसेंबरपर्यंत अतिविलंब शुल्कासह नोंदणी करता येणार आहे. तसेच अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी करण्याची मुदत देण्यात आली आहे. अर्जदार विद्यार्थ्यांची ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्वच जिल्ह्यांत एकाचवेळी परीक्षा होणार आहे.

### अशी होणार परीक्षा



**पहिला पेपर**
**प्रथम भाषा : २५ प्रश्न व ५० गुण**
**गणित : ५० प्रश्न व १०० गुण**
**वेळ : सकाळी ११ ते दुपारी १२.३० पर्यंत**
**दुसरा पेपर**
**तृतीय भाषा : २५ प्रश्न व ५० गुण**
**बुद्धिमत्ता चाचणी : ५० प्रश्न व १०० गुण**
**वेळ : दुपारी दोन ते साडेतीनपर्यंत.**

# परतीच्या पावसात धुक्याचे सावट

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

वातावरण सातत्याने बदल घडत असल्यामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होत असून त्याचबरोबर दुपारी रणरणत्या उन्हामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. पहाटे धुके मोठ्या प्रमाणात पडत असले तरी सुद्धा सायंकाळी आकाशात ढग दाटून येत आहेत. यामुळे हा पावसाळा, उन्हाळा म्हणावा की हिवाळा अशीच स्थिती बळीराजाची झाली आहे.

भात शेती उत्तम बहरली असून काही ठिकाणी धरती सोनेरी शाल परिधान केलेली जाणवू लागली आहे. मात्र सायंकाळ होताच बळीराजाच्या तोंडचे पाणी पळत आहे.

सकाळी जरी वातावरणात धुके पडत असले तरी सुद्धा गुलाबी थंडी जाणवत नाही. मात्र धुक्यामुळे वाट काढणे वाहनचाकांस अवघड जात आहे.त्याच बरोबर दुपारी सूर्यदेवाचे ते उग्ररुप अंगातून अक्षरश: घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत.

सायंकाळी पाऊस पडत असल्यामुळे शेतात तयार झालेले धान्य या पावसाने नुकसान होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत.

भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार झाला असून सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळे लोंब्यातील दाणा अलग होत आहे. मात्र परतीच्या पावसामुळे भात कापणी खोळंबळी आहे. पाऊस पडलातर हाताला भाताचा दाणा मिळणार नाही.

# रेवदंडा पोलिसांचा रूट मार्च

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून रेवदंडा पोलिसांचा जोरदार रूट मार्च पाहाण्यास मिळाला. रेवदंडा बाजारपेठ ते चौल नाका असा रूट मार्चचे आयोजन रेवदंडा पोलिसांनी केले.

रेवदंडा बाजारपेठ, रेवदंडा हायस्कुल, चौल रामेश्वर, चौल नाका आदी ठिकाणी ग्रामस्थांना रेवदंडा पोलिसांचे रूट मार्च याची डोळा पाहाण्याचा योग प्राप्त झाला. प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांचे नेतृत्वाखाली रेवदंडा पोलिसांचा रूट मार्चला सकाळी दहा वाजता प्रारंभ झाला. या रूट मार्चमध्ये सिआयएसएफ जवान, आरसीपी जवान, स्थानिक पोलीस, पोलीस अधिकारी उपनिरीक्षक नंदगावे, गांगुर्डे, सर्व अमंलदार यांनी सहभाग घेतला.



रेवदंडा पोलीस ठाणे येथून प्रारंभ झालेल्या रूटमार्च संकल्पसिध्दी सितारा स्टँड, गोळा स्टॉप, पारनाका, रेवदंडा बाजारपेठ, रेवदंडा हायस्कुल, चौल रामेश्वर, चौल नाका व बायपास मार्गे रेवदंडा पोलीस ठाणे असे मार्गक्रमण रेवदंडा पोलिसांच्या रूटमार्च होते.

# बहुचर्चित नेरळ ग्रामपंचायतीमध्ये सुजित धनगर नवीन प्रशासक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ या रायगड जिल्ह्यात येथील सदस्यांच्या राजीनामा नाट्याने चर्चेत आली आहे. अखेर १० ऑक्टोबर रोजी शासनाने राजपत्र काढून नेरळ ग्रामपंचायत विसर्जित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कर्जत पाणीपुरवठा विभागातील उप अभियंता सुजित धनगर यांना नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक बनविण्यात आले आहे.

१८ जुलै रोजी नेरळ ग्रामपंचायतीमधील १५ सदस्यांनी राजीनामे दिले आणि एकमेव सदस्य उषा पारधी या सरपंच म्हणून कायम होत्या. त्यांचे सरपंच पद सात ऑक्टोबर रोजी काढून घेण्यात आले आणि १० ऑक्टोबर रोजी नेरळ ग्रामपंचायत विसर्जित करण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्याकडून नेरळ ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून सुजित धनगर यांची नियुक्ती करण्याचे आदेश पारित झाले. नेरळ ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून नेमलेले सुजित धनगर हे रायगड जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधाराने विभागाचे कर्जत उप विभागाचे उप अभियंता आहेत.



पान १ वरून

## ‘लाडक्या बहिणीं’ची दिवाळी अंधारात

खात्यांना आधार जोडणी नसल्याने या महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार, राज्यात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या काळात मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या आर्थिक योजना बंद कराव्यात अशा सूचना निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिल्या आहेत.

त्यानुसार, महिला आणि बालकल्याण विभागाकडून या योजनेसाठी लागणारा निधी थांबवला आहे. परिणामी निवडणुकाहोईपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांना मिळणार नाहीत. दरम्यान, राज्य सरकारने या योजनेअंतर्गत ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्र पैसे दिले होते. त्यामुळे आता डिसेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

आर्थिक लाभ देऊन मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या योजना त्वरीत थांबवल्या पाहिजेत, अशा सूचना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या. तसंच, आर्थिक लाभ देणाऱ्या योजनांचा आढावाही घेण्यात आला. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सर्व विभागांकडे याबाबतची विचारणा केली.

त्यानुसार, महिला आणि बालकल्याण विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ दिला जात असल्याचं समोर आलं. त्यामुळे विभागाकडून या योजनेची माहिती मागवण्यात आली आहे. विभागाने या योजनेसाठीचे निधी वितरण चार दिवसांपूर्वीच थांबवल्याची माहिती आयोगाला देण्यात आली. परिणामी निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे लाडकी बहीण योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

## दळवींच्या आमदारकीची ‘वाट’

ठिकठिकाणी खडी पडलेली आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यातून प्रवास करताना प्रचंड त्रास प्रवाशांना होत आहे. एसटी महामंडळासह वेगवेगळी वाहने खड्ड्यांमुळे रस्त्यात बंद पडत आहेत.

अलिबाग-सुडकोली मार्गावरील बोरघर फाट्यापासून नांगरवाडी, ताजपूर खिंडीवर मोठ्या प्रमाणात खडीचे साम्राज्य पसरले आहे. या खड्ड्यांमधून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खिंडीतील दोन्ही बाजूकडील कठडे खराब झाले आहे. त्यामुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण व मजबुतीकरणाच्या नावाखाली सुरु असलेला कारभार धोकादायक ठरत आहे. रेवदंडा, मुरूडकडे जाणाऱ्या पर्यटक व प्रवाशांची संख्या अधिक आहे. परंतु चौल नाका येथे असलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यांचा त्रास प्रवाशांसाठी जीवघेणा ठरत आहे. ग्रामीण भागात प्रधानमंत्री ग्रामसडक, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांचे भूमीपूजन दळवी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. परंतु आजही अनेक गावांतील रस्त्यांच्या कामांना सुरुवात झाली नसल्याची माहिती समोर येत आहे.

निवडणुकीत काम करा, अन्यथा कामे दिली जाणार नाही, अशी धमकीदेखील काही मंडळींना दिली जात असल्याची चर्चा आहे. दळवींच्या या भूमिकेबाबत अलिबाग विधानसभा मतदार संघातील मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

रस्त्यांच्या कामांबाबत दळवींनी दिलेले आश्वासन पूर्ण न केल्याने तीव्र संताप निर्माण झाला आहे. विधानसभा निवडणुकीत जनता त्यांना जोरदार झटका देणार असल्याची शक्यताही वर्तविली जात आहे. परिणामी, मतदारांच्या रोषाला त्यांना सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते, असेही बोलले जात आहे.

## सागरी जलधी क्षेत्रात घुसखोरी

शनिवारी (दि.१९) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सिंधुदुर्ग-मालवण सागर कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री सागरी गस्ती दरम्यान परवाना अधिकारी मालवण मुरारी भालेकरसोबत सहकारी सागरी सुरक्षा पर्यवेक्षक, रक्षक दीपेश मायबा, सागर परब, मिमोह जाधव, राजेश कुबल, प्रणित मुणगेकर, स्वप्नील सावजी, पोलिस कॉन्स्टेबल व्ही. व्ही. पाटोळे यांनी कर्नाटक-मलपी येथील नौका वायुपुत्र २ महाराष्ट्र राज्याच्या जलाधी क्षेत्रात अवैध मासेमारी करताना पकडली. नौका मालकाविरुद्ध महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

**मच्छिमार संतप्त**

मालवण सागरी किनारपट्टी भागात कर्नाटक मलपी तसेच अन्य राज्यातील हायस्पीड ट्रॉलर गेले काही दिवस सातत्याने मोठ्या संख्येने घुसखोरी करून रात्रीच्यावेळी मासळीची लूट करतात. स्थानिक मच्छिमारांची जाळी तोडून नुकसान करतात. एका टॉलरवर कारवाई नको तरी अधिक कारवाई झाली पाहिजे. तसेच पकडलेल्या हायस्पीड ट्रॉलरवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे.

## मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार!

झाल्याचे वृत्त नाही, ही दिलासादायक बाब आहे. ज्यावेळी हा हिंसाचार उसळला, त्यावेळी सुरक्षा दलाने वृद्ध, महिला आणि लहान मुलांना सुरक्षित स्थळी हलविले. जिरीबाम शहरापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेले बोरोबेकरा घनदाट जंगलांनी वेढलेले आणि डोंगराळ भाग आहे.

## चेंबूरमधील मंदिरात भीषण आग

चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाचे जवानांनी बचावकार्य हाती घेतले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. दरम्यान, नेमक्या कोणत्या कारणामुळे आग लागली हे समजू शकलेले नाही.

# रिस येथे पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**। रीस । वार्ताहर ।**

दुर्गा माता नवीन वसाहत रिस येथे गेली चौदा वर्षांपासून नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत आहे. सर्व धर्म समभाव व राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत करून समाजात आदर्श पिढी निर्माण करणे हा या मंडळाचा उद्देश आहे. नवरात्रात नऊ दिवस विविध सांस्कृतिक-कला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

मुली, मुले, महिला व पुरूष यांच्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, नृत्य स्पर्धा, गायन, बकेट बॉल व संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचा बक्षिस वितरणाचा कार्यक्रम रसायनी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर , दिपक कांबळी, पनवेल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज महाडीक यांच्या हस्ते पार पडला. बांगर यांनी सरस्वती नवरात्र मंडळास चौदा वर्षे पूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व सदस्य व सभासदांचे कौतुक केले.



या कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष विलास पुगावकर, चंद्रकांत घाडगे कार्याध्यक्ष प्रकाश मोरे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल पाटील, उपाध्यक्ष शशिकांत माळी व सर्व सदस्य- सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व सुत्र संचालन प्रा. ए. आर. पाटील यांनी व मान्यवरांचे आभार योजना म्हात्रे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# वलपमध्ये रंगणार दिवाळी पहाट

**नवीन पनवेल :** वलपमध्ये प्रथमच धनत्रयोदशीच्या मुहर्तावर गुरुवर्य शंकुनाथ बुवा पडघेकर, पद्माकर बुवा खारघरकर, विष्णु बुवा दाढावकर, मधुकर बुवा धोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ ते ९ वाजता दिवाळी पहाटचे आयोजन केले आहे. यावेळी गायक अमित पाटील (खारघर), महेश पाटील (पेंधर) विश्वनाथ पाटील (वलप), तबला शाम चौधरी (वळवली), पखवाज जीवन पाटील (देवीचा पाडा), युवराज पाटील (वलप) असणार आहेत. नागरिकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जय हनुमान भजन मंडळ व मित्र मंडळ वलपच्या वतीने करण्यात आले आहे.

# दोन लाख ६३ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** फ्रिज विक्री करण्यासाठी दिला असताना पेमेंट देण्यासाठी क्यू आर पाठवून दोन लाख ६३ हजार ३३३ रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

निबिर कश्यप यांनी ओएलएक्स ॲपवर रूममधील फ्रिज विक्री करण्यासाठी जाहिरात दिली. त्यांना ओएलएक्स वरून राहुल शर्मा याने मोबाईल क्रमांक सेंड करण्यासाठी मेसेज केला आणि दहा हजारांची ऑफर दिली. ट्रांजेक्शन फेल होत आहे असे सांगून त्याने आठ क्यू आर कोड पाठवले. कश्यप यांनी दोन लाख ६३ हजार ३३३ रुपये ट्रान्सफर केले. ते समोरील व्यक्तीच्या खात्यावर जमा झाले.

# रस्त्याची साईटपट्टी बनतेय कचराकुंडी

प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।




तालुक्यातील अनेक रस्त्यांच्या साईटपट्टीवरच कचरा टाकला जात आहे. यामुळे रस्त्याची साईटपट्टी कचराकुंडी बनण्याचे संकट वाढले आहे. प्रवाशांसह स्थानिकांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारहून अधिक आहे. दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहवे, येथील रुग्णांना तात्काळ रुग्णसेवा मिळावी यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित ५४ प्राथमिक आरोग्य केंद्र व २८८ उपकेंद्र आहेत. असे असले तरी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्राम पातळीवर घन कचरा व्यवस्थापन नसल्याने रस्त्याच्या दुतर्फा कचरा टाकला जात आहे.

## जिल्हा परिषदेची योजना बारगली

**कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील कचऱ्याचे व्यवस्थानपन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने ग्रामपंचायत स्तरावर कंपोस्ट पीटची संकल्पना राबविली होती. ग्रामपंचायतीने पुढाकार घेत अनेक ठिकाणी कंपोस्ट पीट उभारले होते. या कंपोस्ट पीटमध्ये कचरा टाकण्याचे काम करण्यात आले. परंतु, या कंपोस्ट पीटवर कचऱ्याचा डोंगर उभा राहिला असून काही कंपोस्ट पीट रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तोडण्यात आले आहेत. यामुळे कंपोस्ट पीटची योजनादेखील बारगळी असल्याचे चित्र आहे.**

यामुळे अलिबाग-रोहा तसेच अलिबाग-पेण व अलिबाग-मुरूड या मार्गासह अनेक रस्त्यांची साईट पट्टी कचराकुंडीचा अड्डा बनू लागली आहे. रस्त्याच्या बाजूला कचरा पडल्याने त्याचा नाहक त्रास प्रवासी व स्थानिकांना होत आहे. त्यांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. तसेच, या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढू लागल्याने अपघात होण्याची तसेच कुत्र्यांचा हल्ला होण्याची भिती वाढली आहे. याकडे जिल्हा परिषद प्रशासनाकडून गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.



# रोह्यातील भात पिक धोक्यात

। चणेरा । प्रतिनिधी ।

गेल्या सात ते आठ दिवसांपासून सतत परतीचा पाऊस पडत असल्याने तयार झालेले भातपीक धोक्यात आली आहे. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे तयार भातपीक आडवे पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेला घास परतीचा पाऊस हिसकावून नेतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली असून येथील शेतकरी चिंताग्रस्त झालेला आहे. तालुक्यात गेल्या आठवड्यापासून परतीचा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. चणेरा, मेंढा, धाटाव, खांब, विभाग, सुतारवाडी, कोलाड विभागासह अन्य विभागातील शेतकऱ्यांचे परतीचा पावसामुळे नुकसान झाले आहे.

> **परतीच्या पावसामुळे उभ्या पिकाचे नुकसान होत आहे. काही ठीकाणी भात पडलेला आहे, तर काही जागी रानडुकरे भात लोळवित आहेत. पावसामुळे शेत कापुन घरी आणु शकत नाही. अशाने शेतकऱ्यांने करायचे काय, असा प्रश्न आम्हाला सरकारला विचारायचा आहे. आमची एकच मागणी आहे की, शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा व सरसकट नुकसान भरपाई द्यावी.**
> **– गणेश भगत, अध्यक्ष, शेतकरी विकास प्रतिष्ठान रोहा तालुका**

> **आम्ही जवळपास दिड ते दोन एकर जागेमध्ये सुवर्णा, जया भातशेती केली आहे. यंदा पावसाचे प्रमाण शेतीसाठी पूरक होते. परंतु, परतीच्या पावसामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेले पीक पाऊस हिसकावून घेतो कि काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वादळी वाऱ्यामुळे तयार पीक कोलमडून पडले आहे. या जागेमधुन गेल्या वर्षी तिन खंडी भात पिकले होते. परंतु, या चालु हंगामात उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**
> **– शैलेश पाटील, शेतकरी**

## खालापूरमध्ये लॉं कॉंलेज सुरू

। खोपोली । प्रतिनिधी ।

ठाणे व रायगड जिल्ह्यात सुप्रसिद्ध असलेले खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडाळाच्या पुढाकाराने लॉं कॉंलेज सुरू करण्यात आले आहे.

यावेळी प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ शुक्रवारी (दि.१७) संपन्न झाला. बी.एल. पाटील तंत्रनिकेतनच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबू जळगांवकर, जनता विद्यालयाचे अध्यक्ष कैलास गायकवाड, लॉं कॉंलेजचे अध्यक्ष नरेंद्र शहा, सावरोली शाळेचे अध्यक्ष चंद्रकांत केदारी, छत्रपती विद्यालयाचे अध्यक्ष भास्कर लांडगे, लॉं कॉंलेजचे अँडमीस्ट्रेशन इंचार्ज आणि बी.एल. पाटील तंत्रनिकेतनचे प्रशांत माने, लॉं कॉंलेजच्या ॲड. वर्षा घारे, ॲड. वैशाली मुके, ॲड. तनिष्का देशमुख, ॲड. प्राची देशमुख उपस्थित होते.

# अग्नीशमन प्रतिबंधक शिक्षण संपन्न

। खांब । वार्ताहर ।



रोहा तालुक्यातील श्रमिक माध्यमिक विद्यालय चिल्हे येथे सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज अंतर्गत सुदर्शन सी.एस.आर विभागाच्यावतीने शुक्रवारी (दि.१८) अग्नीशमन प्रतिबंधक यंत्र प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आले.

सुदर्शन सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या मार्गदर्शनानुसार संपन्न झालेल्या उपक्रमामुळे आपल्याला आग लागल्यास कशाप्रकारे योग्य प्रकारे प्रतिसाद द्यावा आणि आपले जीवन, तसेच शाळेतील इतरांची सुरक्षा कशी बाळगावी, याबद्दल आवश्यक माहिती देण्यात आली. तर, प्रमुख मार्गदर्शकांनी प्रशिक्षणात प्रशिक्षकांनी अग्निशमन यंत्रांचा योग्य वापर, आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या कार्यवाहीबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. शाळा गोवे, मुठवलो, शिरवली, चिल्हे, तळवली आणि भिसे तसेच श्रमिक विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता.

# जेएनपीएच्या गटारात कचऱ्याचे साम्राज्य

## स्वच्छ भारत अभियानाचा उडाला बोजवारा

। उरण । वार्ताहर ।



जेएनपीए प्रकल्पग्रस्त असणाऱ्या सोनारी, करल गावांच्या वेशीवरील जेएनपीएने निर्माण केलेल्या नैसर्गिक पाणी निचरा होणाऱ्या गटारात कचऱ्याचे साम्राज्य दिसून येत आहे. यामुळे संपूर्ण गटार तुंबल्याने स्वछतेचा बोजबारा निर्माण झाला आहे. यामुळे मच्छर, उंदीर, घुशीचा वावर वाढला असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जेएनपीए परिसरात प्रकल्पग्रस्त असणारी सोनारी, करळ ही गावे जेएनपीए-पनवेल, नवीमुंबईकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याला येत आहेत. गावातील पाणी निचरा होण्यासाठी जेएनपीएच्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करून मुख्य गटाराची निर्मिती करण्यात आली होती. या गटाराच्या बाजूला हॉटेल तसेच अनेक खाद्य पदार्थांची व दारूची दुकाने आहेत. या दुकानांच्या लगत करल फाटा हा सर्वात मोठा रहदारीचा भाग असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रवासी उभे असतात. मात्र, या गटारात खाद्य पदार्थांचा कचरा तसेच बाटल्याचा खच निर्माण झाला असून मच्छरांचा प्रादुर्भाव देखील वाढला आहे.

# रिक्षाचालकाचा वृद्धेवर हल्ला

। पनवेल । वार्ताहर ।

रिक्षामध्ये बसलेल्या वृद्ध महिलेला आडमार्गावर नेऊन तिच्या डोक्यात दांडक्याने हल्ला करून तिचे दागिने व मोबाईल फोन लुटून फरार झालेल्या रिक्षाचालकाला कळंबोली पोलिसांनी व मध्यवर्ती गुन्हे कक्षाने अवघ्या काही तासांत अटक केल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. अनंता पालेकर (३९) असे या आरोपी रिक्षाचालकाचे नाव असून त्याला पतपेढीकडून कर्ज भरण्यासाठी तगादा लावण्यात येत असल्यामुळे त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे.

या घटनेतील गुलाब केशव पाटील (६०) ही वृद्ध महिला गुरुवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास तळोजा येथील आरएएफ सिग्नल येथून नावडे येथे कामानिमित्त आरोपी अनंता पालेकर याच्या रिक्षामधून नावडे येथे जात होती. नावडे गावाजवळ रिक्षामध्ये असलेली दुसरी महिला उतरून गेल्यानंतर आरोपी रिक्षाचालकाने गुलाब पाटील यांना नावडे येथे न उतरवता, त्यांना नावडेच्या पुढे आडमार्गे रेल्वे पटरीच्या बाजूने निर्जन ठिकाणी नेले.

त्यानंतर त्याने गुलाब पाटील यांच्या डोक्यामध्ये लाकडी दांडका मारून त्यांना जखमी केले. त्यानंतर आरोपीने त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने व मोबाईल फोन असा सुमारे सव्वा तीन लाख रुपये किमतीचा ऐवज लुटून पोबारा केला होता.

# पाककला लाडू स्पर्धेचे आयोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।



माथेरान शहरात नवरात्र उत्सव मंडळाच्यावतीने कोजागिरी पौर्णिमेला महिलांसाठी पाककला लाडू स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. २८ स्पर्धकांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेबरोबर महिलांसाठी विविध खेळ आयोजित करण्यात आले होते.

माथेरान शहरातील राजाराम साळुंखे रोड येथील नवरात्र उत्सव मंडळाच्यावतीने कोजागिरी पौर्णिमा निमित्त महिलांसाठी विविध खेळ आणि पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी पाककला स्पर्धेत माथेरान शहरातील २८ महिलांनी लाडू पदार्थ संबंधित विविध पाककृती स्पर्धेसाठी मांडल्या होत्या. या सर्व पाककृतींचे परीक्षण पूनम सकपाळ आणि लविना सांकला यांनी केले. यात डिंक, ड्रायफ्रूट, नाचणी हलीम, मेथी, बाजरी, चुरमा, रवा, बेसन, खोबरं आदी अनेक प्रकारचे पौष्टिक, लो कॅलरी, फायबर युक्त लाडू या स्पर्धेत ठेवण्यात आले होते.

पाक कला लाडू स्पर्धेत प्रथम क्रमांक उडीद डाळीचे लाडू, द्वितीय क्रमांक विविध प्रकारच्या बियांपासून बनवलेले लाडू, तसेच तृतीय क्रमांक पान लाडू आणि चौथ्या क्रमांकाची चार बक्षीसे देण्यात आली.

# जयचा कला उत्सवात सहभाग

। माणगाव । प्रतिनिधी ।

जय नितीन बडे याने विभागीय कला उत्सव स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन ऊत्तम सादरीकरण करून श्रोत्यांची मने जिंकली आहेत. पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथील इयत्ता नववी वर्गात जय शिक्षण घेत आहे. त्याने पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय अमरावती येथे संपन्न झालेल्या विभागीय कला उत्सव स्पर्धेमध्ये एकल तबलावादन या कलाप्रकारात पुणे क्लस्टरचे प्रतिनिधित्व केले. त्याच्या या सहभागाबद्दल मनोज राऊत तसेच इतर सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

त्याच्या ऊत्तम सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.





● अलिबागमधील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला. मुंबई येथील कार्यालयात पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. दरम्यान, पक्षाचे ओबीसी सेलचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, ओबीसी सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष लवेश नाईक यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## सुतारवाडी येथे वारंवार वीज गायब; नागरिक त्रस्त

। सुतारवाडी । वार्ताहर ।

गेल्या आठवड्यापासून सुतारवाडी आणि अन्य परिसरामध्ये वारंवार वीज गायब होत असल्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. शुक्रवारी (दि.१८) सायंकाळी साडेपाच वाजता गेलेली लाईट सात वाजे तरी आलेली नव्हती. यामुळे येथील नागरिकांना अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे. यातच पाऊस ये-जा करत असल्यामुळे मच्छरांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. तसेच, सर्वत्र अंधार असल्यामुळे साप व विंचू दंश करण्याची शक्यता आहे. या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

# सुतारवाडी नाक्यावर करडी नजर

। सुतारवाडी । वार्ताहर ।



सुतारवाडी नाक्यावर दसऱ्यापूर्वीच सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यामुळे अनेक गोष्टींना आळा बसला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यापूर्वी सुतारवाडी नाक्यावर एका दुकानात चोरीचा प्रकार घडला होता. याच प्रकारे एका अज्ञाताने नाक्यावर लावलेला एक बॅनरही फाडले होते. सीसीटीव्ही कॅमेरामुळे आता नाक्यावर घडणाऱ्या सर्व गोष्टींचा रेखा जोगा कळणार असल्यामुळे अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सुतारवाडी नाका हा सोळावाड्यांचे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्याचप्रमाणे सुतारवाडी परिसरात अनेक फार्म हाऊस असल्यामुळे नेहमी या परिसरामध्ये सातत्याने पर्यटकांची गर्दी असते. सुतारवाडी पासून पुणे हे अंतर शंभर किमी असल्यामुळे येथून सातत्याने वाहतूक चालू असते. याचप्रमाणे सुतारवाडीपासून आठ किलोमीटर अंतरावर विळे बागड परिसरामध्ये अनेक कंपन्या असल्यामुळे या परिसरातून अनेक अवजड वाहने सातत्याने धावत असतात. या सर्वांवर आता सीसीटीव्ही कॅमेराची करडी नजर राहणार आहे. यामुळे आता या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही.

## राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचा विशेष पुरस्कार

# गजानन पाटील यांचा सन्मान

। अलिबाग । प्रतिनिधी ।




अलिबाग तालुक्यातील नवगांव येथील रहिवासी, थळ येथील आरसीएफ कंपनीचे माजी कर्मचारी गजानन नथु पाटील यांचा नुकताच विशेष सन्मान करण्यात आला. कोल्हापूर येथील शाहू स्मारक भवन-दसरा चौक येथे सोमवारी (दि.१४) राज्य गुणवंत कामगार असोसिएशन, महाराष्ट्र आणि जागृत नागरिक सेवा संस्था, महाराष्ट्र यांच्यावतीने भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. उत्कृष्ट समाजसेवेबद्दल राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचा विशेष पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

गजानन पाटील हे मानवता सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून समाजाच्या दुर्बल घटकांसाठी काम करत आहेत. दिव्यांग, अनाथ, आदिवासी आणि पिवळी शिधापत्रिका असलेल्या गरीब कुटुंबांसाठी ते शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यास मदत करत आहेत. विशेषतः गरजूंना शिलाई मशीन, झेरॉक्स मशीन, साडी फॉल बिडिंग मशीन यांसारख्या आर्थिक उपजीविकेच्या साधनांचे वितरण करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी शेतकरी वर्गाच्या विकासासाठीही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. खत नियोजन, आधुनिक शेती तंत्रज्ञान प्रशिक्षण आणि (सगुणा राइस टेक्नोलॉजी) यासारख्या तंत्रज्ञानाची जनजागृती करून शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्यास पाटील यांनी प्रोत्साहित केले आहे.

तसेच, शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सतत कार्यरत असतात. यामध्ये फवारणी यंत्र, ताडपत्री, गोबर गॅस, सोलर पंप, विहीर बांधणे यासारख्या योजनांचा समावेश आहे. आदिवासी समाजासाठी सामूहिक विवाह सोहळे आयोजित करून त्यांच्यात सामाजिक एकात्मतेची भावना रुजवण्याचे कार्य केले आहे. गरजू मुलांना वह्या, खाऊ वाटप आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन करून त्यांनी समाजसेवेत आपली अमूल्य कामगिरी बजावली आहे.

या सन्मान सोहळ्यात पाटील यांचे योगदान समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या या सन्मानामुळे नवगाव गावासह अलिबाग तालुक्यातील आणि रायगड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये अभिमानाचे वातावरण आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तसेच शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील आणि मान्यवरांनी त्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.



# मध्य रेल्वेचा भोंगळ कारभार

## नेरळ येथील रेल्वे फाटक पुन्हा चार दिवस बंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

**मध्य रेल्वेच्या नेरळ माथेरान मिनी ट्रेन मार्गावरील फाटक क्रमांक २ हे पुढील चार दिवस बंद राहणार आहे. दुरुस्तीच्या कामासाठी हे फाटक बंद राहणार असल्याचे फलक रेल्वे प्रशासनाकडून लावण्यात आले आहेत. दरम्यान, याच माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील मेन लाईन वरील रेल्वे फाटक मागील महिन्यात तब्बल सहा दिवस बंद होते. यामुळे याच कालावधीत गेट नंबर दोन मध्ये देखील दुरुस्तीची कामे करता आली असती, अशी प्रतिक्रिया नेरळकर व्यक्त करीत आहेत.**



मध्य रेल्वेच्या नेरळ-माथेरान या मिनीट्रेन मार्गावर पाडा येथे फाटक क्रमांक दोन आहे. हे फाटक माथेरान-नेरळ-कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर आहे. या फाटक दोनपासून १०० मिटर अंतरावर मुंबई-पुणे मेन लाईन वरील फाटक आहे. या मेन लाईन वरील फाटक दुरुस्तीचे काम मागील महिन्यात करण्यात आले होते. २५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत या ठिकाणी दुरुस्तीची कामे करण्यात आली. या काळात पूर्ण सहा दिवस मेन लाईन वरील फाटक क्रमांक २ बंद ठेवण्यात आले होते आणि या काळात नेरळ पूर्व आणि पश्चिम विभागाचा संपर्क तुटला होता. यावेळी नेरळ माथेरान मिनीट्रेन मार्गावरील फाटक क्रमांक दोनची दुरुस्तीची कामे करता आली असती. मात्र, शनिवार दि.१९ पासून २२ ऑक्टोबरपर्यंत हे फाटक वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद राहील, असे जाहीर करण्यात आले आहे.

मागील महिन्यात फाटक २ ची दुरुस्ती केली जात असताना मिनी ट्रेन मार्गावरील फाटक दोनची दुरुस्ती करण्यात आली असती तर ऐन सणासुदीच्या दिवसात फाटक बंद ठेवल्याने मोठी गैरसोय होणार आहे. सध्या शाळा, महाविद्यालय यांच्या परीक्षांचा हंगाम सुरू आहे. यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षेच्या ठिकाणी पोहचण्यासाठी प्रचंड गडबड सुरू असते. यात दिवाळी सणाची खरेदी सुरू झाली असून सणासुदीच्या काळात फाटक बंद ठेवण्यात येत असल्याने नाराजी पसरली आहे. यातच मेन लाईनवरील फाटक दुरुस्तीचे काम केले जात असताना मध्य रेल्वेचे कर्मचारी हे केवळ आठ तास काम करायचे. अन्य कालावधीत कोणताही रेल्वे कर्मचारी कामाच्या ठिकाणी नसायचा. यामुळे एक दोन दिवसांचे काम पूर्ण करायला सहा दिवस लागले होते. मध्य रेल्वे प्रशासनाने याबाबत नियोजन करावे, अशी मागणी वाहनचालक आणि ग्रामस्थ करीत आहेत.

### दिवसातले १६ तास कामबंद

**नेरळपाडा येथील माथेरान रेल्वे गेट बंद करणार आहेत. परंतु, याआधी मध्य रेल्वेने ट्रॅक बनवण्यासाठी ५ दिवस लावले होते. आता माथेरान लाईनवरील ट्रॅक बनवण्यासाठी ४ दिवस गेट बंद केलेला आहे. याचा त्रास असंख्य नागरिकांना करावा लागणार आहे. तसेच, रेल्वे कर्मचारी फक्त ८ तास काम करून बाकीचे १६ तास काम बंद ठेवतात. या कारणाने यांना चार दिवस गेट बंद करावा लागत असून याची चौकशी व्हावी. अशी मागणी होत आहे.**

## आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

**नवीन पनवेल :** भाड्याने रूम मिळवून देण्याचे आमिष दाखवून बोलण्यात गुंतवले आणि लाखो रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आदित्य घाडीया हा खारघर येथे राहत असून त्याला मोबाईलवर रूम भाड्याने मिळवून देणारी वेबसाईट दिसली. या नंबरवर कॉल केला असता दीपक चव्हाण यांनी बोलण्यात गुंतवून मोबाईलद्वारे क्यूआर कोड पाठवला. यावेळी १० हजार ५०० रु. आदित्य यांनी पाठवले. पैसे मिळाले नसल्याचे सांगून पुन्हा पाठवण्यास सांगितले. यानंतर पुन्हा रूम सेफ्टी करता पैसे मागितले. बोलण्यात गुंतवून आणखी ४२ हजार रुपये जमा करण्यास सांगितले. वारंवार पैशाची मागणी होत असल्याचे लक्षात आले. यावेळी आदित्यने व्यवहार रद्द करायचा आहे. माझे पैसे परत करा, असे दिपकला सांगितले. यावेळी त्याने पैसे परत करण्यासाठी आणखी काही पैसे भरावे लागतील, असे सांगितले. रक्कम पुन्हा मिळेल या आशेपोटी आदित्य याने एकूण १५ लाख ८५ हजार रुपये त्याला पाठवले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वडवली ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सतिश काशिनाथ मराडे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३८ | ४/ब /१ | ०.१६.०० | १.५० |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड मो.नं. ७७९८४३३८८८

सही /
**ॲड.कैलास अनंत बासरे**

# करंजा बंदरात मच्छिची आवक वाढली

## कोळी बांधवांना आले सुगीचे दिवस

। उरण । वार्ताहर ।



ऑक्टोबर महिन्यात करंजा मच्छीमार बंदरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासळीची आवक वाढली आहे. आवकेच्या तुलनेत मागणी चांगली असल्याने व घाऊक बाजारात माशांना भाव चांगला मिळत असल्याने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना सुगीचे दिवस आले आहेत. यामुळे कोळी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत आहे.

मुंबई येथील वाहतूक कोंडी व इतर समस्यांमुळे भाऊचा धक्का येथील ससुन डॉक येथील मच्छीमार बंदरावरील भार कमी करण्यासाठी करंजा येथील मच्छीमार बंदर उभारणीच्या कामाला सुरुवात केली होती. या बंदराच्या विकासासाठी सुमारे १५३ कोटींच्यावर निधी मंजूर करून खर्च करण्यात आला आहे. करंजा बंदर देशातील मत्स्यव्यवसायासाठी सर्वात मोठे फिशिंग हार्बर म्हणून विकसित करण्यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी एका कार्यक्रमात सांगितले होते.

सध्या करंजा मच्छीमार बंदराचे काम काही अंशी अपुर्ण अवस्थेत आहे. मात्र, कोळी बांधवांच्या आग्रह खातर करंजा मच्छीमार बंदरातून खोल समुद्रातील मासे विक्री केली जाते. या बंदरातील विविध जातींचे १५० टनांपर्यंत मासे हे मुंबई, ठाणे प्रमाणे गुजरात, गोवा, आंध्र प्रदेशसह दक्षिण भारतात जाते. एकंदरी करंजा मच्छीमार बंदरातून मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील माशांची देवान घेवाण ही मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून विविध राज्यांतील भागात होते. यामुळे कोळी बांधवांना सुगीचे दिवस आले असून माशांच्या विक्रीतून चांगला भाव मिळत असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत आहे.

उरण, अलिबाग, रेवदंडा या ठिकाणावरील कोळी बांधव मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. भाऊचा धक्का येथील बंदरातून मत्स्यव्यवसाय करताना येथील कोळी बांधवांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. मात्र, राज्य सरकारने उभारलेला करंजा मच्छीमार बंदर हा खुप फायद्याचा ठरणार आहे.

> **सध्या या बंदरातून १५० ते २०० टन खोल समुद्रातील मासे हे मुंबई बरोबर गुजरात गोवा आणि दक्षिण भारतात विक्रीसाठी जात असून या मत्स्यव्यवसायातून चांगला भाव मिळत आहे. मात्र, बंदराला जोडणाऱ्या रस्त्याचे काम हे अपुर्ण अवस्थेत तसेच तसेच सुविधा उपलब्ध नसल्याने त्याचा त्रास कोळी बांधवांना सहन करावा लागत आहे.**
> **- नारायण कोळी, माजी चेअरमन, करंजा मच्छीमार सहकारी संस्था**

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री.दीपक मारुती ढाकवळ, यांनी जमीन मालक मनोहर वाळकू पाटील, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - वावे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २६/४ | ०.२९.४०<br>पो.ख. ०.००.२०<br>एकूण : ०.२९.६० | १.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. २०/१०/२०२४

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. जनार्दन दामाजी कोलंबे २) श्री. पदमाकर दामाजी कोलंबे ३) श्री. भरत दामाजी कोलंबे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४२ | ७ | ०-१६-०० | ०=३४ |
| ४२ | ९ | ०-२२-५० | ०=८१ |
| ४२ | १७ | ०-०२-३० | ०=०६ |
| ४५ | २ | ०-०६-०० | ०=१७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, दान, बक्षीसपत्र फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/१०/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

# सामाजिक बांधिलकी जपणारे नंदकुमार उर्फ बाळा पाटील



**ॲड. रत्नाकर पाटील**

नंदकुमार पाटील यांचा परिचय म्हणजे साधी रहाणी, चांगले विचार, अंगमेहनत, प्रामाणिकपणा, आपल्या व्यवसायामध्ये प्रेम करणारे आणि समाजात सामाजिक आपुलकी जपणारे अज्ञात शत्रू तसेच एक विश्वासू मित्र अशी ओळख अलिबाग तालुक्यामध्ये आहे. अशा नंदकुमार पाटील यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

नंदकुमार दामोदर पाटील यांचा जन्म २० ऑक्टोबर १९६४ रोजी विरवाडी येथे झाला. त्यांच्या आई शांताबाई पाटील, वडील दामोदर पाटील व तीन मोठे भाऊ अशा कौटुंबिक परिवारात ते सगळ्यात लहान असल्याने त्यांना लहानपणापासून बाळ असे टोपण नाव आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण सुतारपाडा जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण तिनविरा हायस्कूलमध्ये झाले. १९६८ पासून त्यांच्या आईचा व्यवसाय पीठ मसाला दळणे हा होता. ते शाळेत सहावीला असल्यापासून आईला पीठ गिरणीमध्ये मदत करू लागले. तेव्हापासून मशिनरी खोलजोड दुरुस्ती करणे या कामाची शिकवण त्यांच्या मोठ्या भावांकडून घेऊ लागले होते. दहावीचे शिक्षण झाल्यावर कॉलेजला अकरावीमध्ये प्रवेश घेतला. पण त्यांना लहानपणापासून मिलिटरीची ओढ असल्यामुळे सैनिक होण्याची स्वप्न पाहत होते. त्यामुळे शिक्षण थांबून तिकडे जाण्याचा निर्णय घेतला होता. पण सर्व मोठे भाऊ सरकारी नोकरीमध्ये मोठ्या हुद्द्यावर होते. त्यामुळे घरचा व्यवसाय व आई-वडिलांची देखभाल करण्याकरता घरात दुसरा कोणी नसल्याने आई-वडिलांचे आग्रहाखातर घरचाच व्यवसाय सांभाळण्याचे ठरवीले. वयाच्या १५ व्या वर्षी व्यवसायाची कमान हाती घेऊन काम चालू केले. आणि १९८४ साली भात गिरणी व्यवसाय चालू केला. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने १ लाख ३० हजार रुपये स्टेट बँकेचे कर्ज घेऊन व्यवसायाला सुरुवात केली. स्वतःची अंग मेहनत, सचोटी, प्रामाणिक व्यवसायाची तत्त्व बाळगून चालल्याने त्यांची प्रगती चालू झाली.

१८ मे १९८७ रोजी बहिरीचापाडा माणकुळे येथे ते वंदना म्हात्रे यांच्याबरोबर विवाहबद्ध झाले. जीवनात आनंदाचे क्षण येऊन सर्व ठीक होत असतानाच नोव्हेंबर १९८८ ला वडील हृदयविकाराने अचानक मयत झाले. लहान वयात व्यवसायाची पूर्ण जबाबदारी घेऊन व्यवसाय रमून गेले. त्यांना तीन आपत्य होऊन परिवार वाढला. वडील मयत झाल्याने त्यांची समाजात जाणे येणे चालू झाले. त्यातूनच सामाजिक कामाची आवड निर्माण झाली.

२००६ साली सरकारने बुल्स इंडिया कंपनीचा सेझ प्रकल्प अलिबाग तालुक्यात खारेपाट विभागात आणला होता. शेतकऱ्यांच्या जमिनीवर बळजबरीने खरेदी करून त्यांना विस्थापित करायचे होते. त्यांच्याविरुद्ध खारेपाटातील २२ गावांनी मिळून संघर्ष समितीची स्थापना केली होती. या समितीचे उपाध्यक्ष म्हणून नंदकुमार पाटील यांनी काम केले. मोर्चे, धरणे, रास्ता रोको, न्यायालय लढाई करून समितीला यश आले. त्यांनी २००७ मध्ये परहुर येथे नवीन वंदना राईस मिल व्यवसाय चालू केला. व्यवसायात यशस्वी असे पदार्पण केले. विरवाडी येथील सात पाड्यांचे एक जुने जोगेश्वरी मंदिर होते. त्यांनी २००८ मध्ये या मंदिराचे जीर्णोध्दाराचे काम हाती घेतले. उदार देणगिदाराच्या देणगीतून सुंदर असे भव्य मंदिर उभे केले.

तसेच, २००७ ते २०१० मध्ये सलग तीन वर्ष कामार्ले ग्रामपंचायत महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले. कामार्ले ग्रामपंचायतिला तंटामुक्त ग्राम अभियान मध्ये बक्षीस पात्र होण्यासाठी मेहनत घेऊन ४ लाख ५० हजार रुपये बक्षिस मिळून दिले. तसेच, ग्राम पंचायतला निर्मल ग्राम पुरस्कार मिळवण्यासाठी बहुमोल कामगिरी केली. नंदकुमार पाटील यांचे वैशिष्ट्य म्हणजे वयाच्या १८व्या वर्षापासून आजूबाजूच्या साधारण ३०ते ४० गावांमध्ये लग्नकार्य, प्रेतयात्रा, वाढदिवस, सामाजिक सभा अशा विविध सुख दुखाच्या कार्यात ते नेहमी हजर असतात. स्वतः व्यवसाय करत असताना सर्व मुलांना उच्च पदवीचे शिक्षण दिले आहे. आजही समाजात वैवाहिकवाद, कौटुंबिक वाद, हिस्सा वाटप किंवा सामाजिक तंटे मिटवण्याचे काम करण्याची त्यांची हातोटी आहे. या सर्व सेवा एक सामाजिक बांधिलकी म्हणून करत असतात.

२०१७ मध्ये मसाला व्यवसायात अद्यावत मशनरी आणत मोठ्या प्रमाणात काम चालू केले आहे. दरवर्षी हजारो किलो मसाला दळण्याचे काम करतात. यामध्ये त्यांच्या परिवाराचा हातखंड आहे. नंदकुमार उर्फ बाळा पाटील यांची स्वतःची ओळख अशी की साधी राहणी, चांगले विचार, आजातशत्रू असे व्यक्तिमत्व आहे. त्यांना बाळा पाटील या टोपण नावाने जास्त ओळखले जाते. नवीन पिढी त्यांना आदराने आबा म्हणून हाक मारतात. त्यांची उच्चशिक्षित दोन मुले अभिजीत पाटील एमबीए फायनान्स तर संकेत पाटील मेकॅनिकल इंजिनिअर आहे. दोन्ही मुलांनी काही वर्ष नोकरी करून आपल्या वडिलांच्या व्यवसायात सामील झाले आहेत.

नंदकुमार पाटील यांना नेहमी व्यवसाय वाढवण्याची ओढ असते. त्यांनी एप्रिल २०२३मध्ये अलिबाग-वडखळ हायवेवर पळी येथे स्व वऱ्हाडी मिसळ हा हॉटेल व्यवसाय चालू केला. कोणताही अनुभव नसताना नवीन व्यवसायात पदार्पण केले. त्यांच्या दोन्ही मुलांनी नवीन व्यवसाय उत्तमपणे उभारण्याचे काम चालू ठेवले आहे. व्यवसाय कोणताही असून अपार कष्ट करून व्यवसायातील बारकावे शोधून त्याप्रमाणे काम करणे हे त्यांचे व त्यांच्या परिवाराचे यशाचे गमक आहे. अशा हरहुन्नरी व्यक्तीमहत्व असणाऱ्या नंदकुमार पाटील उर्फ बाळा पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते कि, आम्ही खालील वर्णन केलेले शेतजमिन मिळकत त्या जमिनीचे मालक श्री. बळीराम चिमा वाघमारे व इतर यांचे कडुन कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिनीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमिनीचे वर्णन**

| अ.क्र | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | १३ | १ | १.४७.२० | ५.७८ |
| २. | १३ | २ | ०.०१.४० | ०.०३ |

तरी वरील प्रमाणे मिळकतीचा इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षीस, बोजा, लिज, मृत्युपत्रांकित दान, कोणत्याही प्रकारचा हक्क असलेल्या संबधीतानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात यावी. या प्रमाणे कोणतीही हरकत न आल्यास वरील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली.

दिनांक :- २०/१०/ २०२४

**ॲडव्होकेट पुजा मनोहर बासरे,**
मु. माणगाव तर्फे वरेडी,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ७०६६९४५५०५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे जोहे, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती शारदा राजेंद्र घोणे वगैरे १. रा. जोहे, ता. पेण, जि. रायगड यांच्या मालकीची असून सदरहु मिळकत ही आमचे अशिल सौ. रेश्मा विनोद पाटील रा. घर नं. १०४७, दत्त आळी, दत्त मंदिरा जवळ, मु.पो. जोहे, ता. पेण, जि. रायगड हे विकत घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| गांव | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| जोहे | ४३/२ | ०.१३.४०<br>पो. ख ०.०३.८० | २.०६ |
| | | एकुण ०.१७.२० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संपुर्ण क्षेत्र हे या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण.
दि. १९/१०/२०२४

सही/-
**(ॲड. एस. के. दळवी)**
मु. मांगरुळ, पो.कामार्ली,
ता. पेण, जि. रायगड
फोन नं. ७२७६९६००७२

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबाग मधील क्लीनिक व वेलनेस सेंटरसाठी पुरुष मदतनीस पाहिजेत, वयाची शिक्षणाची अट नाही मो. ९२२६७६६१२९/९३७०५१७९४९
- नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- Freshers पाहिजेत : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com
- फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएबल, संपर्क :- ८२७५११९८८३.
- अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरीता फ्रेश इंटेरियर डिझाईन कोर्स केलेले ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क :- ९४२२०९४१५१.
- Rasik Hardware Alibag. 9422690854. Male Staff Requirement Experience Of Atleast 1 Year.Salary 12000.
- वरदान फ्युअल स्टेशन येथे कामासाठी मुलगी पाहिजे शिक्षण १५ वी पास व कॉम्प्युटर कोर्स (Tally, Excel) व कमीत कमी एक वर्षाचा एक्सपिरिअन्स हवा भेटायला येण्याची वेळ 10 AM To 4PM संपर्क : ७४४७४०४४११, ७४४७४०४४३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२० ऑक्टोबर**

१) श्रीम. मेधना जीवन कुळकर्णी श्रीबाग, २०-१०-१९४२
२) श्री. नारायण महादेव कुंटे आक्षी, अलिबाग, २०-१०-१९४५
३) श्रीम. स्नेहल श्रीनिवास जोशी अलिबाग, २०-१०-१९५१
४) श्रीम. प्रियवदा प्रमोद सुर्वे चेंढरे, २०-१०-१९५५
५) श्री. अशोक राजाराम राऊत नवगाव, २०-१०-१९५४
६) श्री. कृष्णा गोविंद जाधव श्रीबाग, २०-१०-१९४८
७) श्री. अशोक पांडुरंग जाधव अलिबाग, २०-१०-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## पाच लाख बियांचे वाटप

**नवीन पनवेल :** आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने आपटा या वृक्षाच्या पाच लाख बिया वाटप करण्यात आल्या. आर्या वनौषधी संस्थेच्या या उपक्रमास सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, अमरावती, रायगड येथील वृक्षप्रेमींनी उदंड प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमास आर्या पाटील, प्रदीप घरत, रविंद्र बुदर, डॉ.अशोक तांबेकर शिवदास चेचरे यांचे सहकार्य लाभले.

# पतसंस्थांनी आर्थिक शिस्त पाळावी

## सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ .उदय जोशी यांचे प्रतिपादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नियामक मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या पतसंस्थांना दिवसेंदिवस कडक नियमांचा सामना करावा लागत आहे. परंतु सहकार चळवळीत काम करणाऱ्या संस्थांनी आर्थिक शिस्त पाळली तर कोणतीही पतसंस्था अडचणीत येणार नाही असे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी केले .




रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा महासंघ मर्यादित अलिबाग व सहकार भारती प्रशिक्षण संस्था यांचे संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे पतसंस्था संचालक, अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.जोशी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महासंघाचे सचिव योगेश मगर, सुधन गोल्ड कं.चे प्रवर्तक संदीप कोयटे, राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, सहकार प्रशिक्षक नितीन वाणी, सीए वैभव जोशी, अमित ओझे, जगदिश कवळे, ॲड. के. एस.पाटील, दिलीप पटेल, नरेन जाधव, हेमंत पाटील, गणेश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

भांडवलाची पर्याप्तता, वसुली, योग्य व्यवस्थापन आदी घटक अत्यंत महत्त्वाचे असुन एनपीए विषयी विशेष सजकता असली पाहिजे. शून्य टक्के एनपीए पेक्षा ग्रॉस एनपीएवर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता असल्याचे निर्देश त्यांनी दिले. अशंदाना ची पतसंस्थांनी दरवर्षी तरतुद करून ठेवल्यास सहकार खात्याकडून पूर्वलक्षी प्रभावाने अशंदान वसुल केल्यास संस्थाना ते भरणे शक्य होईल असा निर्वाळा डॉ.उदय जोशी यांनी दिला.

सोने तारण कर्ज सुरक्षित असल्याने खासगी कंपन्या ग्राहकांची दिशाभूल करून अव्वाच्या सव्वा व्याज वसुल करीत आहेत. पतसंस्थांनी सोनेतारण कर्जातील बारकावे लक्षात घेऊन सामान्यांना तातडीने कर्ज उपलब्ध करून द्यावे असे संदीप कोयटे यांनी सांगितले.

प्रशिक्षक नितीन वाणी यांनी सहकार खात्याकडून नियुक्त केलेल्या नियामक मंडळाने घालून दिलेल्या कार्यपद्धतीमुळे पतसंस्था अधिक जबाबदारीने व पारदर्शीपणे उत्तमरित्या कार्य पार पाडू शकतील असे सांगून कॅमेल रेटींग विषयी विस्तृत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर ऑडिटची पूर्व तयारी नीट केल्यास संस्थेचा खरा आरसा ऑडिटच्या माध्यमातून सभासदांसमोर आणणे शक्य होईल याकडे लक्ष वेधले.

अध्यक्षीय भाषणात राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील यांनी पतसंस्थांनी कारभारात त्रुटी न ठेवता एसएल आर व सीएल आर या रेशोंकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे आणि सहकार खाताकडून आलेल्या परिपत्रकांची गांभीर्याने अंमल बजावणी करावी असे आवाहन केले.

योगेश मगर यांनी सहयोगी सदस्य संस्थांसाठी उत्तमोत्तम प्रशिक्षक आणून प्रबोधन करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करीत आहे तथापि महासंघाकडे नियमितपणे संस्था वर्गणी भरत नसल्याची खंत व्यक्त केली.

# नेत्यांच्या फोटोशिवाय द्यावा लागणार ‘आनंदाचा शिधा’

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील ३३ लाखांहून अधिक सर्वसामान्य शिधापत्रिकाधारकांना गौरी- गणपतीचा शिधा अजूनही मिळाला नाही. त्याचे वाटप विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे थांबले. कारण, तो शिधा ज्या पिशवीतून द्यायचा आहे, त्यावर सत्ताधारी नेत्यांचे फोटो आहेत. मसकाळफच्या दणक्यानंतर धान्य गोदामात पडून असलेला आनंदाचा शिधा त्या पिशवीशिवाय वाटप करण्यास शासनाने परवानगी दिली आहे.

गौरी- गणपतीचा उत्सव संपून आता दिवाळी तोंडावर आली, तरीदेखील रेशन दुकानांमधून लाभार्थींना आनंदाचा शिधा मिळालेला नाही. त्यात साखर, चणा डाळ, तेल व रवा या चार वस्तू आहेत. त्या वस्तू सरकारने अवघ्या १०० रुपयांत देण्याचा निर्णय घेतला. विधानसभा आचारसंहितेत त्या पिशवीतून आनंदाचा शिधा देण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### लाखो पिशव्या बिनकामाच्या

विद्यमान सरकारने पावणेदोन कोटी शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा देण्यासाठी लाखो रुपयांच्या पिशव्यांची छपाई करून त्या राज्यातील सर्व रेशन दुकानांना पाठवल्या. त्यावर पंतप्रधान व राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे फोटो आहेत. पण आता त्या लाखो रुपयांच्या पिशव्या आचारसंहितेमुळे वापरता येणार नाहीत. त्या तशाच रेशन दुकानांमध्ये ठेवाव्या लागणार आहेत.

# रासळ येथे शेतकऱ्यांसाठी शेती प्रशिक्षण

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

नैसर्गिक शेती धोरणास अनुसरून कृषी विज्ञान केंद्र किल्ला व रोहा मार्फत सुधागड तालुक्यातील रासळ येथे नैसर्गिक शेतीची तत्वे आणि कार्य पद्धती या विषयावर नुकताच एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.



सदर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, डॉ. राजेश मांजरेकर व शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य शरद गोळे यांनी मार्गदर्शन केले.

शरद गोळे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा विषद केली. प्रमुख मार्गदर्शक डॉ. मांडवकर यांनी शेतीची सद्यस्थिती पर्यावरणातील बदलते घटकांचा शेतीवर होणारा परिणाम व भविष्यकालीन उपयोजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. राजेश मांजरेकर यांनी नैसर्गिक शेतीची नावे व कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन करताना शेतीमध्ये बिजामृत, जीवामृत, घन जीवामृत, गांडूळ खत, दशपर्णी अर्क व वापसा स्थिती या गो आधारित शेती पद्धतीमधील घटकांविषयी माहिती दिली.

यानंतर कृषी अधिकारी अशोक महामुनी यांनी सुधारित शेती तंत्रज्ञान व समूह शेती विषयक मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना रासळ सरपंच प्रणिता खाडे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना शेतीच्या नवीन तंत्राचा अवलंब करण्याविषयी आवाहन केले.

हिरकणी बचत गट महासंघाच्या विद्या सावंत यांनी या कार्यक्रमाची आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉक्टर मनोज तलाठी यांचे मार्गदर्शकाखाली सर्व अधिकारी यांनी तसेच कृषी मित्र संघटना, सुधागड पालीचे सर्व संचालक व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला विशेष मेहनत घेतली त्यामुळे हा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

# शालेय आवश्यक वस्तू हस्तांतरण सोहळा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

पोस्को व एम.डी.मोटर्स या कंपनीमार्फत सीएसआर फंडातून प्रशालेला स्मार्ट टी.व्ही.-५५, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, ग्रंथालय कपाट, टेबल, संपूर्ण माईक सिस्टिम, स्पॉट लाईट आणि इतर शैक्षणिक साहित्य प्रशालेस सुपूर्द करण्यात आले. मुंकी चुन या कोरियन पाहुण्यांच्या हस्ते हा साहित्य हस्तांतरण सोहळा पार पडला.



स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांची प्रेरणा घेऊन म्हसळा हायस्कूल कामकाज करत असताना विद्यालयाचे माजी प्राचार्य यांनी पोस्को या कंपनीला संपर्क साधून गतवर्षी प्रशालेतील गुणवत्ता व भौतिक सुविधा वाढीसाठी येणाऱ्या अडचणी समजून दिल्या. यासाठी विद्यमान प्राचार्य डी.आर.पाटील यांनी वारंवार संपर्क साधला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे ढोल व लेझीमच्या गजरात स्वागत करण्यात आले.


मान्यवरांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. या कार्यक्रम प्रसंगी मॅनेजिंग डायरेक्टर मुंकी चुन, डायरेक्टर रोहन्क जैन, अजय शर्मा, पोस्को मॅनेजर सुधीर भोसले, तरुण उद्योजक एच. पी. गॅस आणि सारा पेट्रोल पंप मालक सईद अहमद कादिरी, प्रविण गुरव, इम्तियाज जुमल, प्रतोष झा, रोहन चव्हाण, दीपक कुमार, भानू प्रताप आणि पोस्को स्टाफ उपस्थित होता.

सर्व साहित्य प्राचार्य डी. आर. पाटील यांनी स्वीकारले. कोरियन पाहुण्यांना बापूजींच्या कार्याची माहिती इंग्रजी विषयाचे प्रा. चक्रधर चव्हाण यांनी दिली. प्राचार्य डी.आर. पाटील यांनी या वर्षी प्रशालेसाठी इमारतीसाठी पत्राशेडची मागणी केली. त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहू असे पोस्कोचे मॅनेजर सुधीर भोसले यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डी. आर.पाटील यांनी केले, सूत्रसंचालन एम. जे. मुंडे यांनी केले व शेवटी आभार डी. सी.आमले यांनी मानले.

# साप्ताहिक राशिभविष्य २० ते २६ ऑक्टोबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## परदेशात जाण्याची संधी



**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात ग्रहांचा प्रभाव तुमचे शिक्षण, तुमची संतान, तुमचे प्रेम संबंध आणि तुमच्या शारीरिक सुखांवर पडेल. तुम्ही आपले वाहन घेण्यात सक्षम व्हाल म्हणून, तुम्हाला वाहन खरेदी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे एक उत्तम वाहनाचे स्वामी बनू शकाल. या कालावधीत वेळी तुम्ही उच्च कोटीच्या सुखांचा आनंद घ्याल आणि आपल्या सुख सुविधांवर चांगले खर्च ही कराल. तुम्हाला नोकरी बदलल्याने बरेच लाभ मिळू शकतात आणि तुमच्या करिअरसाठी हे परिवर्तन बरेच चांगले सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी प्राप्त होऊ शकते, यामुळे त्यांच्या लांबवर जाऊन प्रतिक्षित उच्च शिक्षणाची कामना पूर्ण होऊ शकते. विद्यार्थी यावर्षी बऱ्याच परीक्षेत चांगले प्रदर्शन करतील आणि परिणाम स्वरूप खूप चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हाल. **महिलांना-** आपण थोड मनावर संयम ठेवा चांगल्या घटना घडणार आहेत त्याचा फायदा करून घ्या, आठवड्याचा शेवटी धनलाभ होईल. घरात शांतता ठेवा. **शुभदिनांक-** २३,२६.

## सामाजिक स्तर वाढेल



**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला जर तुम्ही नोकरी करतात तर, तुम्हाला आपल्या कामावर पूर्ण रूपात लक्ष द्यावे लागेल. अन्यथा तुमच्या कार्यालयात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो. व्यावसायिक भागीदारीमध्ये अनेक आव्हानांचा सामना करतील. परदेशात व्यापार करणाऱ्या लोकांसाठी हा कालावधी बरेच अनुकूल राहू शकते. या कालावधीत तुमचे अनेक विदेशी संपर्क स्थापित होतील, ज्याचा तुम्हाला दूरगामी लाभ प्राप्त होईल. तुमचा सामाजिक स्तर वाढेल आणि समाजात तुम्हाला चांगली प्रतिष्ठा मिळेल. या कालावधीत तुम्ही अनेक महत्वाच्या पदांवर असलेल्या लोकांसोबत संबंध स्थापित कराल, जे भविष्यात तुम्हाला बरेच उपयोगाचे ठरतील. आता तुम्हाला स्वतंत्र वाटेल आणि तुम्ही प्रामाणिकपणे अनेक निर्णय घ्याल. **महिलांना-** तुम्हाला एका गोष्टीची काळजी घेणे गरजेचे आहे की, बऱ्याच वेळा तुमचे निर्णय चुकीचे ही असू शकतात म्हणून, कुणी वरिष्ठ आणि अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन काही कार्य करा अन्यथा बऱ्याच लाभ स्थानात हानी उचलावी लागू शकते. जर सांभाळून चालले तर, सोपे होईल. **शुभदिनांक-** २०,२४.

## समाजात मानसन्मान मिळेल




**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला हा कालावधी तुमच्या जीवनासाठी चांगल्या कालावधीचा एक महत्वपूर्ण सिद्ध होईल यावेळी तुम्हाला काही नवीन व्यवसाय सुरु करण्यापासून सावध राहावे लागेल कारण, अशी शक्यता आहे की, जर तुम्ही काही कार्य सुरु कराल तर, तुम्हाला त्यात यश कदाचित कमी मिळू शकते. यासाठी तुम्हाला आपल्या क्षेत्राच्या अनुभवी आणि मुख्य लोकांच्या सहयोग प्राप्ती हेतू प्रयत्न करावे लागतील आणि ते तुमची मदत करतील. या सर्वांच्या व्यतिरिक्त ही परिस्थिती अशी बनू शकते की, तुम्ही इच्छा असतांना ही त्यांच्या सल्ल्याचा उपयोग करण्यात सक्षम राहणार नाही आणि तुम्हाला काही नुकसान उचलावे लागू शकते. याकालावधीत तुम्हाला आपल्या कार्याने अनेक प्रवासास जावे लागू शकते त्यात अधिकांश यात्रा यशस्वी राहतील. **महिलांना-** तुमच्या कुटुंबातील समस्या सोडविण्यास तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. यामुळे आपणास समाजात मान सन्मान मिळेल, आपणास अनेकबाबी मध्ये सहज यश मिळेल. त्यात आपण पारंगत व्हाल. **शुभदिनांक -** २३,२५.

## आर्थिक स्थिती सुधारेल




**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला प्रवासामध्ये तुम्हाला समस्या ही येतील म्हणून, वेळ राहताच या बाबतीत विचार करा आणि पूर्ण प्लॅनिंग सोबत कुठल्या ही यात्रेवर जा म्हणजे कुठल्या प्रकारच्या असुविधा होणार नाही. या राशीत तुम्हाला पैतृक संपत्ती प्राप्त होण्याची चांगलीच शक्यता आहे तसेच अचानक काही ही अप्रत्यक्षित लाभ मिळू शकतो. आठवडा संपता संपता शेवट पासून तुमच्या खर्चात अप्रत्यक्षात वृद्धी होईल या कारणाने ही तुम्हाला काही फायनान्शिअल समस्यांमधून जावे लागू शकते म्हणून, जी वेळ तुमच्यासाठी उपयुक्त आहे त्या वेळी धनाचा सदुपयोग करा आणि त्याला अर्जित करण्याचा पूर्ण प्रयत्न करा म्हणजे कठीण वेळेत तुम्हाला कुठल्या ही प्रकारच्या समस्यांनी त्रास होणार नाही. **महिलांना-** या कालावधीत तुम्हाला परदेशी संपर्काने अधिक लाभ मिळू शकतो. म्हणून पूर्ण प्रयत्न करा की, तुमच्या व्यवसायाचा संबंध विदेशातून अथवा विदेशी लोकांनी ठेवल्यास तुमची आर्थिक स्थिती बऱ्याच प्रमाणात सुदृढ होईल. यावेळी जर काही वाद चालत आहे तर, त्यात तुम्हाला यश मिळेल सोबतच त्याने तुम्हाला आर्थिक लाभ ही मिळू शकतो. **शुभदिनांक-** २१,२३.

## आर्थिक हानी होण्याची शक्यता



**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला या कालावधीत तुम्हाला आपल्या जीवनसाथीच्या आरोग्यावर चांगला खर्च करावा लागू शकतो कारण, अशी शक्यता आहे की, त्यांच्या आरोग्य संबंधित समस्या राहील म्हणून, यावेळी तुम्हाला मुख्य रूपात आपल्या मित्राचे प्रबंधनावर बरेच विचारपूर्वक काम केले पाहिजे म्हणजे विपरीत परिस्थितीमध्ये ही तुम्हाला कुठल्या प्रकारच्या फायनान्शिअल समस्येतुन जावे लागणार नाही. यावेळी तुम्हाला आपल्या धनाची गुंतवणूक खूप गरज असल्यासच केली पाहिजे. शेअर्स, सट्टा बाजार, लॉटरी इत्यादी मध्ये जर तुम्ही पडले नाही तरच उत्तम कारण, या कालावधीत या कार्यांच्याद्वारे तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता दिसत आहे म्हणून, यावेळी तुम्हाला धन संबंधित गोष्टींमध्ये आणि आर्थिक जीवनाला घेऊन बरेच विचारपूर्वक चालावे लागेल आणि आपल्या समाजाचा परिचय द्यावा लागेल. **महिलांना-** असे कुठल्या ही व्यक्तीला पैसे देऊ नका ज्यांच्याकडून परत मिळण्याची शक्यता कमी आहे अर्थात, प्रत्येक रिस्क घेण्यासाठी तुम्हाला या वेळी विचार करावा लागेल अन्यथा तुम्हाला दिलेले धन परत मिळण्यात समस्या होऊ शकते. **शुभदिनांक -** २२,२४

## यश प्राप्ती होईल



**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला याकालावधीत मिश्रित परिणाम प्राप्त होतील. तुमच्या संचार कौशल्यात आणि संबंधात विस्तार होईल आणि तुम्ही प्रकृती आणि जीवनात खूप काही शिकाल. काही नवीन मित्र ही भेटतील. सुरवातीमध्ये तुम्ही भविष्य हेतू अनेक योजना बनवाल ज्यामध्ये तुम्हाला यश प्राप्ती होईल आणि लांब वेळेपासून आटकलेल्या तुमच्या अनेक इच्छेची पूर्ती होईल तसेच तुम्हाला आपल्या जीवनात प्रेम आणि रोमान्सचे स्वागत करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. जर तुम्ही नात्यामध्ये आधीपासून आहे किंवा कुणाच्या शोधात आहे तर, बृहस्पती तुम्हाला या बाबतीत आनंद देण्याचे कार्य करेल. या वर्षी तुमच्या विवाहाची कामना ही पूर्ण होऊ शकते **महिलांना-** यामध्ये जर तुम्ही प्रयत्नरत आहे तर,आपल्या प्रयत्नांना थोडे वाढावा आणि ईश्वर कृपा आणि त्यांच्या आशीर्वादाने तुम्ही यावेळी एक चांगला जीवनसाथी प्राप्त करण्यात यशस्वी व्हाल. या राशीतील लोकांची व्यावसायिक भागीदारीच्या प्रभावाने बराच होईल तथापि, कुणी इतर व्यक्तींसोबत आपल्या वित्तीय संसाधनांना जोडण्याच्या आधी तुम्हाला बराच स्टडी केला पाहिजे, **शुभदिनांक -** २३,२४.

## विदेशी यात्रेचे योग संभवतात




**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला यावेळी मिश्रित परिणाम प्राप्त होतील. तुम्हाला याकालावधीत काही नवीन संधीची प्राप्ती होईल आणि त्या संधींना आपल्या पक्षात मोडण्यासाठी तुमच्या जवळ पूर्ण ऊर्जा आणि सहनशक्ती ही असेल. तुम्ही जे कुठले काम करण्यास घ्याल त्यात तुम्हाला यश मिळेल आणि सुचारू रूपात तुमचे सर्व उद्यम चालत राहतील. याकालावधीत सुरवातीमध्ये याराशीला सुरवातीमध्ये सर्वात आधी. या राशीच्या अनुसार यावेळी तुम्ही लहान दूरची यात्रा अधिक कराल आणि या यात्रेपासून तुम्हाला लाभ होईल. सुरवातीमध्ये तुम्ही तीर्थ यात्रेवर जाऊ शकतात. याच्या व्यतिरिक्त समाजसेवेने जोडलेल्या कामानिमित्ताने ही काही यात्रा करू शकतात. मध्यानंतर तुमचे विदेश यात्रेचे चांगले योग बनतील. **महिलांना-** यावेळी बऱ्याच लांब वेळेपासून अटकलेली तुमच्या अनेक मनोकामना पूर्ण होतील यामुळे तुमचे मनोबल ही वाढेल. तुम्ही घर बनवण्यात अथवा प्रॉपर्टी खरेदी करण्यासाठी लोन घेऊ शकतात. तुम्ही अनेक विषयात रुची घ्याल आणि त्यांच्या बाबतीत जाणण्याची इच्छा ठेवाल. **शुभदिनांक -** २०,२५

## यशाची प्राप्ती होईल



**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आत्ता तुम्ही या दिशेमध्ये प्रयत्नरत राहून भरपूर फायदा उचलण्यास तयार व्हा. जर तुम्ही नोकरी करतात तर, तुम्हाला मनासारखे स्थानांतरण मिळू शकते. जर तुम्ही आपल्या घरापासून दूर राहून नोकरी करतात तर, यावेळी तुम्ही त्यांना घराजवळ येऊ शकतात. जर तुम्ही काही व्यवसाय करतात तर, त्यावेळेत तुम्हाला अनेक यात्रेवर जावे लागेल जे तुमच्या व्यावसायिक संबंधांना मजबूत बनवाल. जर तुम्ही कुठल्या रचनात्मक कार्यात लागलेले आहे तर, हे सर्व तुमचे आहे. अनुसार यावेळी तुम्हाला काही लहान-मोठी समस्या आणि बाधेचा ही सामना करावा लागेल आणि काही कठीण समस्येतून जावे लागेल. तुम्ही बरेच उत्साहात राहाल. **महिलांना-** आपल्या ऊर्जेच्या बळावर प्रत्येक आव्हानांचा सामना कराल आणि त्यावर यश प्राप्त कराल परंतु, तुम्हाला लक्ष दिले पाहिजे की, अत्याधिक आवेगाला पूर्ण करण्यासाठी तुमच्या आसपासचे लोक प्रभावित होतील म्हणून, धैर्य पूर्वक काम करा. काही कठीण कार्यांना तुम्हाला पूर्ण करावे लागेल यामुळे तुम्हाला जीवनात पुढे जाण्याचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल. **शुभदिनांक -** २१,२६

## व्यवसायात गुंतवणूक करा




**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही स्थान परिवर्तनाचा अनुभव कराल. अर्थात काही लोकांची ट्रांसफर होईल आणि काही लोकांना नोकरीमध्ये बदलात यश प्राप्त होईल. जर तुम्ही व्यवसाय करतात तर, प्रगती प्राप्त कराल. सुरवातीमध्ये बरेच मजबूत संकेत देतील. तुम्हाला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सहयोग मिळेल. तुम्ही आपल्या कार्य कौशल्याचे परिचय द्याल आणि आपले शत-प्रतिशत योगदान देण्याचा प्रयत्न वर्षभर कराल. तुम्हाला आपल्या कार्य क्षेत्रात बऱ्याच कामासाठी तुमचे कौतुक होईल याच्या व्यतिरिक्त जर तुम्ही मोठ्या कंपनी सोबत काम करत आहे तर, तुमचे प्रदर्शन तुम्हाला पुढे घेऊन जाईल या राशीसाठी आर्थिक दृष्टिकोनाने चांगले आहे कारण, या वेळेत धन आवक लागोपाठ कायम राहिल्याने तुम्हाला आपल्या हातामध्ये धन आगमन वाटेल आणि तुमचे आर्थिक जीवन उन्नत होईल. **महिलांना-** यावेळी तुम्ही नवीन वाहन खरेदी करू शकतात. बऱ्याच वेळेपासून तुमचे धन अटकलेले असेल आणि त्याला त्याला मिळवण्यात तुम्हाला समस्या येत असेल तर, तुम्हाला ते धन यावेळी परत प्राप्त होऊ शकते. व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी हे वर्ष बरेच लाभदायक आहे. **शुभदिनांक -** २४,२५

## मेहनत करावी लागेल



**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला काही कलात्मक अभिरुची मध्ये अधिक वेळ लावू शकतात. हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होईल कारण, या वेळी तुम्ही आपल्या क्षेत्रात स्थापित होण्याची अपेक्षा ठेऊ शकतात जिथे एकीकडे तुम्ही अधिकात अधिक लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न कराल तेच ग्रहांची स्थिती अत्याधिक खर्चाकडे इशारा करते म्हणून, यावेळी तुम्हाला आपले वित्तीय प्रबंधन खूप विचार पूर्वक करावे लागेल आणि पैश्याच्या देवाण घेवाणीत आधी पूर्ण विचार करणे उत्तम असेल. बऱ्याच वेळा तुम्हाला असे वाटेल की, विना प्रयत्नाने ही तुमचे धन व्यय झाले यापासून वाचण्यासाठी तुम्हाला एक चांगले बजेट बनवण्याची योजना केली पाहिजे आणि त्यावर अंमलबजावणी ही नक्कीच करा अन्यथा तुम्ही आर्थिक समस्यांना सामोरे जाऊ शकतात. सुरवातीपासून महिन्याच्या शेवट पर्यंत आणि नंतर विशेष रूपात तुमच्या जवळ पैशांचा चांगला स्रोत असेल आणि तुम्ही चांगले धन अर्जित करू शकाल. **महिलांना-** या वेळी तुम्हाला आपल्या भाग्याची साथ मिळेल तसेच काही लोकांना वारसा किंवा पैतृक संपत्ती प्राप्त होण्याची शक्यता दिसत आहे. या कालावधीत तुम्हाला धन कमावण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल. **शुभ दिनांक -** २२,२३

## मित्रांचे सहयोग प्राप्त होईल



**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला हे शक्यतेचे दिवस आहे काहीतरी शक्य होऊ शकते आणि तुमच्याकडे ते सामर्थ्य आहे की, तुम्ही आपल्या बळावर कठीणातील कठीण लक्ष्य मिळवू शकतात. जर आपल्यावर काही लांब वेळेपासून कर्ज चालू असेल तर, यावेळी तुमच्याकडून पूर्णपणे चुकवण्यात यशस्वी व्हाल आणि निश्वास सोडाल. भाऊ-बहिणींसोबत उत्तम संबंध कायम ठेवा आणि कुठला ही वाद वाढू देऊ नका. लक्षात ठेवा भाऊ बहिणींच्या मदतीने तुम्ही पुढे जाऊ शकाल. तुम्हाला मित्रांचे सहयोग प्राप्त होईल जे तुम्हाला सकारात्मक विचारांसोबत पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करेल. तुमच्या कौटुंबिक जीवनासाठी बरेच शुभ राहण्याची शक्यता आहे. कुटुंबात परस्पर ताळमेळ मजबूत होईल. **महिलांना-** एकमेकांच्या मदतीने आपण कौटुंबिकरूपात संपन्नता प्राप्त कराल तसेच एकमेकांच्या प्रति मानसन्मान मध्ये वृद्धी ही होईल. सुरवातीमध्ये कुटुंबात सुख आणि शांती तसेच सद्भावनेचे वातावरण राहील आणि तुम्हाला ही आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल तसेच तुम्ही स्वयं आपल्या कुटुंबाच्या प्रति सर्व कर्तव्यांचे निर्वाहन चांगल्या प्रकारे करतील. **शुभदिनांक -** २०,२१

## परदेश योग संभवतात



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जर तुम्ही आपल्या व्यापार किंवा कुठल्या अन्यकामासाठी कुटुंबापासून दूर राहतात तर, बऱ्याच प्रमाणात तुम्हाला या समस्यांतून मुक्ती मिळू शकते. तुम्ही आपल्या वाणीच्या बलावर लोकांना आपले बनवाल आणि त्यांच्याशी मनातील मळ दूर करून शांती आणि सद्भाव स्थापित करू शकतात. या राशीतील जातकांना यावेळी काही आनंद आणि काही आव्हाने दोघांना सोबत ठेऊन पुढे जावे लागेल. जर तुम्ही प्रत्येक आव्हानांचा हिंमतीने सामना करण्यात यशस्वी झाले तर, तुमच्यासाठी हा कालावधी उत्तम होण्यास कोणीच रोखू शकणार नाही. प्रभाव मुख्य रूपात तुमच्या कार्य क्षेत्रात, तुमच्या कौटुंबिक जीवनात, तुमच्या वाणी, तुमच्या स्वास्थ्य आणि संतानवर पडेल. **महिलांना-** मनाचा प्रभाव विशेष रूपात तुमच्या स्वास्थ्य आणि खर्चांवर पडेल आणि तुमच्या खर्चात अप्रत्यक्षित रूपातवृद्धी होऊ शकते. एक ग्रह स्वास्थ्य कारणाने तुम्हाला चिंतीत करू शकते परंतु, जर तुम्हाला विदेशात जाण्याची इच्छा आहे तर, तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषतः गल्फकंट्रीजमध्ये तुम्ही आरामात जाऊ शकाल. **शुभदिनांक -**२१,२६.

# पर्यटनातून 'ती'ला आर्थिक बळ

पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनमानातही बदल घडू लागले आहेत. पर्यटकांना आवश्यक असणारे निवास, भोजन, वाहतूक, माहिती, मनोरंजन आदी व्यवस्थेसोबतच त्या भागातील उत्पादीत वस्तू व खाद्य पदार्थांना देखील मागणी निर्माण होऊ लागली आहे. सांस्कृतिक आदानप्रदानाबरोबरच नागरिकांना एकमेकांशी जोडण्याचे कामदेखील पर्यटनाच्या माध्यमातून होते. त्यातून अर्थकारणालादेखील गती मिळत आहे.



**प्रमोद जाधव**



मागील काही वर्षापासून रायगडच्या पर्यटनाला एक वेगळी उभारी मिळू लागली आहे. अलिबागसह नागाव, आक्षीबरोबरच अनेक किनारी असलेल्या गावांना पर्यटनातून चालना मिळू लागली आहे. पर्यटकांच्या पसंतीनुसार घरगुती पद्धतीने खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी ग्रामीण भागातील हजारो महिलांच्या हाताला काम मिळू लागले आहे. महिलांचा पर्यटन क्षेत्रातील सहभाग, त्यांच्या आर्थिक विकासाला चांगले साधन ठरू लागले आहे. या क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता व नेतृत्व गुण विकसित होण्यास चालना मिळू लागली आहे. यातून त्यांना आर्थिक बळ मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढू लागले आहे. लहान मोठे प्रकल्प उभे राहू लागले आहेत. प्रकल्प उभे राहत असताना नागरिकीकरणदेखील वाढत आहे. ग्रामीण भागाचा विस्तार वाढत आहे. औद्योगिकीकरणाबरोबरच पर्यटनालादेखील महत्व प्राप्त आहे. समुद्रकिनारी फिरण्याबरोबरच घोडागाडी, उंटावरील सवारी तसेच अन्य सागरी खेळाचा आनंद पर्यटक मनमुरादपणे लुटत आहेत.

अलिबाग, आक्षी, नागाव व वरसोली या समुद्रकिनाऱ्यांसह मांडवा बंदरालगत असलेले आवास, किहीम अशा अनेक समुद्रकिनारी फिरण्यास येण्याचा क्रेझ वाढू लागला. शनिवार व रविवारी किनारे पर्यटकांनी फुलू लागले. सुट्टीच्या दिवशी पर्यटक येत असल्याने स्थानिक व्यवसायिकांना रोजगार मिळू लागला. खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या वस्तू, साहित्य विक्रेत्यांना रोजगाराचे दालन खुले झाले. पूर्वी फक्त पर्यटन व्यवसायासाठी पुरूषांचीच मक्तेदारी होती. मोजक्याच महिला पर्यटनातून व्यवसाय चालवित होत्या.

परंतु समुद्रमार्गे दीड तासात अलिबागला पोहचणे शक्य झाल्याने शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवसाबरोबरच आठवड्यातील सातही वार पर्यटक आता अलिबागला येऊ लागले आहेत. कुलाबा किल्ला, खांदेरी किल्ला, समुद्रकिनारा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होऊ लागली.

जिल्ह्यातील विशेषतः अलिबाग, वरसोली, आक्षी, नागाव, रेवदंडा , किहीम, आवास या समुद्रकिनारी पर्यटन हळूहळू मोठ्या प्रमाणात वाढू लागले. गेल्या पाच वर्षापासून नागाव, आक्षी, वरसोली, किहीम या भागात पर्यटन वाढीला गती मिळू लागली आहे. येथील समुद्रकिनारे, नारळी पोफळीच्या बागांचे आकर्षण पर्यटकांना अधिक होऊ लागले. नगरपरिषद, ग्रामपंचायतीमार्फत किनारी वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. किनारी लहान मोठे कॉटेज उभे राहू लागले.

इतर क्षेत्रापेक्षा पर्यटन हे सर्वात वेगात वाढणारे क्षेत्र आहे. त्यामुळे या क्षेत्राला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आहे. समुद्रकिनारी लहान मोठे व्यवसाय सुरु झाले आहेत. या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे.

निसर्गाच्या सहवासात आनंदाचे क्षण घालविण्याची आणि नवनवीन कला, संस्कृतीविषयी जाणून घेण्याची मानवी प्रवृत्ती पर्यटनाचा मूळ आधार आहे. समाज, गाव, तालुका, जिल्हा, राज्य, व देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे पर्यटनाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनमानातही बदल घडू लागले आहेत. पर्यटकांना आवश्यक असणारे निवास, भोजन, वाहतूक, माहिती, मनोरंजन आदी व्यवस्थेसोबतच त्या भागातील उत्पादीत वस्तू व खाद्य पदार्थांना देखील मागणी निर्माण होऊ लागली आहे. सांस्कृतिक आदानप्रदानाबरोबरच नागरिकांना एकमेकांशी जोडण्याचे कामदेखील पर्यटनाच्या माध्यमातून होते. त्यातून अर्थकारणालादेखील गती मिळत आहे.

रायगड पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. वर्षाला दहा लाखाहून अधिक पर्यटक जिल्ह्याला भेटी देतात. विशेष म्हणजे समुद्रकिनारी राहण्यावर पर्यटक अधिक भर देत आहेत.

मुंबई, पुणे व अन्य जिल्ह्यातील पर्यटकांनी गेल्या काही कॉटेजमध्ये राहण्याला पसंती दिली. सागरी मासळीवर ताव मारण्याकडे पर्यटक अधिक भर देत आहेत. त्यात घरगुती पद्धतीचे जेवण पर्यटकांना अधिक आवडू लागले. वाढत्या पर्यटनामुळे स्थानिक महिलांना रोजगाराचे साधन खुले झाले. सुडकोलीपासून बोरघर, महाजने, वावे, आंदोशी अशा अनेक परिसरातील महिलांच्या हाताला काम मिळू लागले आहे.

घरात राहणाऱ्या महिला पर्यटनामुळे बाहेर पडू लागल्या. आपला पर्यटन व्यवसाय सांभाळत असताना कुटूंब चालविण्याचे काम महिला खंबीरपणे करू लागल्या आहेत.


काही गावांमधील पंधरा ते वीस महिलांचा ग्रुप तर काही महिला व त्यांच्या घरातील मंडळी एकत्र येऊन कॉटेज चालवू लागल्या आहेत. पर्यटनातून मिळणाऱ्या रोजगारातून आपल्या कुटूंबाला हातभार देण्याचे काम महिला सक्षमपणे करीत आहेत.

नागाव, आक्षी या समुद्रकिनारी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. या पर्यटकांना घरगुती जेवण मिळत आहे. खाद्य पदार्थांचा मनसोक्तपणे आस्वाद त्यांना घेत येत आहे.

पर्यटन व्यवसायातून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक बळ मिळू लागले आहे. महिलांना त्यांची आर्थिक उन्नती साधण्याची संधी यातून उपलब्ध होऊ लागली आहे. ✻✻

# बिश्णोई समाज आणि भूतदया





जगा आणि जगू द्या या उक्तीप्रमाणे विचार केला तर सर्व प्राणीमात्रांना जगण्याचा हक्क आहे आणि तो आपण हिरावून घेऊ शकत नाही. मानव बुद्धीजीवी प्राणी असल्याने तो इतर प्राणीमात्रापेक्षा वरचढ ठरला पण सजीव प्राणीमात्रांची हत्या ही वाईटच! जीवनचक्राचा विचार केला तर आहारासाठी काही मांसाहारी प्राणी दुसऱ्या प्राणीजीवांवर अवलंबून आहेत असा विचार करणारे बरेच असतील. मानव सोडून इतर प्राण्यांच्या बाबतीत ते ठीक आहे. पण माणसाला तर इतर जंगली प्राण्यांसारखी नखं दात नाहीत ना! मग मुक्या जीवांचा असा बळी का घ्यावा? त्यांना जगण्याचा अधिकार नाही का? पर्यावरण काय फक्त मानवाचेच आहे का? भूतदया ही असलीच पाहिजे. प्राण्यांची हत्या करून मांसाहारी बनविण्यापेक्षा सर्व प्राणीमात्रांना जगू द्यावे. दर रविवारी आणि बुधवार, शुक्रवारी कित्येक करोडो प्रमाणात बकरी, कोंबडी यांची कत्तल होत असेल ना! त्या बिचाऱ्या मुक्या जीवांच्या नशिबी असे दुःख का लिहिले असावे? मग काही समाज हे थांबविण्यासाठी अगदी प्राचीन काळापासून प्रयत्न करीत आहे. त्याबद्दल थोडंसं.

विष्णूचे अनुयायी म्हणजे विष्णोई राजस्थानी लोक व चा ब उच्चार करतात. जसे विश्वास नाव असेल तर बिश्वास वापरण्याची परंपरा म्हणून बिश्नोई वसईला बसई असे. काही लोक म्हणतात. तसेच बिश्नोई समाज हा मुख्यतः राजस्थानमध्ये आढळणारा एक लोकसमुदाय आहे. हा समाज आपल्या पर्यावरणाच्या प्रतिनिष्ठेसाठी प्रसिद्ध आहे. ते लोक प्राणी आणि झाडांना पवित्र मानतात. त्यांच्यात २९ धार्मिक नियम आहेत. ज्यात प्राणी आणि झाडांचे संरक्षण करणे ही एक प्रमुख गोष्ट आहे. बीस (२०) अधीक नौ (९) म्हणूनही बिश्नोई असे म्हटले जाते. तसेच प्राणीप्रेमी लोक बिश्नोई समाजाला प्राणीप्रेमी लोक असेही म्हणतात. ते पर्यावरणाच्या संरक्षणासाठी समर्पित आहेत. बिश्नोई समाजाची स्थापना गुरु जंभेश्वर यांनी केली होती. गुरू जंभेश्वर, ज्यांना गुरू जांभाजी म्हणूनही ओळखले जाते, (१४५१-१५३६) हे बिश्नोई पंथाचे संस्थापक होते. त्यांनी शिकवले की देव ही दैवी शक्ती आहे जी सर्वत्र आहे. निसर्गासोबत शांततेने सहअस्तित्वात राहण्यासाठी वनस्पती आणि प्राणी दोन्ही महत्त्वाचे असल्याने त्यांचे संरक्षण करण्यासही त्यांनी शिकवले. बिश्नोई लोक जोधपूरजवळच्या पश्चिमी रेगिस्तानातून येतात. या समाजाची ओळख निसर्गप्रेमी समाज म्हणून आहे. निसर्गाला



हे लोक देव मानतात. त्यामुळे ते निसर्गाच्या रक्षणासाठी आपला जीवदेखील देतात. इतिहासात डोकावून बघितल्यास या समाजाने निसर्गाच्या रक्षणासाठी अनेक आंदोलनं केलेली आहेत. आंदोलनात लोकांचे जीवदेखील गेलेले आहेत. या समाजात २९ या आकड्याचं विशेष महत्व आहे. कारण हे लोक आपले आराध्यगुरु जम्भेश्वर यांनी सांगितलेल्या २९ नियमांचं पालन करतात. यामध्ये एक नियम शाकाहारी राहाणं आणि हिरवी झाडं न तोडणं, हाही आहे.

बिश्नोई समाजाचे लोक निसर्गासाठी आपला जीवही देतात आणि अशा लोकांना शहिदाचा दर्जा मिळतो. साधारण ५५० वर्षांपासून बिश्नोई समाज निसर्गाची पूजा करतो. राजस्थानसह हरियाना, पंजाब, उत्तरप्रदेश आणि मध्य प्रदेशात बिश्नोई आढळून येतात.

बिश्नोई समाजातील स्त्रिया हरिणांच्या पिल्लांना आपल्या मुलांप्रमाणे सांभाळतात. भुतलांवरील सर्व प्राणी मात्रांना मातृत्वाचा जिव्हाळा लावतात ही विश्वात्मकता

**धनंजय शेटये**

वाखाणण्याजोगी आहे. मुक्या जीवांचे आशीर्वाद लाखमोलाचे असतात. सर्व प्राणी माणसांसोबत इमानदारपणे वागतात. पण मानव मात्र या सर्व प्राणीमात्रांचा वापर करून घेत असतो. बैलांचा शेतीसाठी, बैलगाडी ओढण्यासाठी वापर करतो. गाढवाचा वापर ओझे वाहण्यासाठी तर कोंबडी- शेळी- बकरा यांचा वापर मांसाहारासाठी करतात. मग आपण त्या मुक्या जीवांच्या भावना समजून घ्यायला नको का? सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करायला शिका! मग निसर्गाचे सौंदर्य अनुभवावे! प्राणीजगताच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी मानवानेच पुढाकार घेणे गरजेचे आहे. प्राण्यांची होणारी नाहक हत्या थांबविण्यासाठी मानवानेच प्रयत्न केला पाहिजे पण जीवांसाठी जीव घेऊन बदला घेऊ नये. बदल्याने बदला घेतला तर ते बदल्याचे चक्र कधी थांबणार नाही. हिंसाचाराने बदला घेणारी वृत्ती हैवान बनत जाते. शेवटी आपल्यामध्ये आणि हैवानामध्ये फरक तो काय? संतांनी खरी भूतदया शिकवली. भारतीय तत्वज्ञानाचे खरे रुप संतपरंपरेत दिसून येते. संतांनी मानवता शिकवली माणसाने माणसाशी माणसासारखे वागण्याची शिकवणूक संतांनी दिली. नाहीतर आदिमानव आजही जनावरांप्रमाणे राहिला असता. ✻✻

सर्वसामान्यांना चंदेरी दुनियेतील नायक नायिकांच्या बद्दल नेहमीच आकर्षण राहिले आहे. त्यांच्या सभोवतालचा झगमगाट पाहून आपणही त्यांच्यासारखंच मोठं सेलिब्रेटी व्हावे असे प्रत्येकाला वाटणे स्वाभाविक आहे. नायक नायिकांना खूप नाव मिळते, प्रसिद्धी मिळते, पैसा मिळतो त्यामुळे आपणही त्यांच्याप्रमाणेच बनावं अशी जवळपास प्रत्येकाची इच्छा असते. पण ते प्रत्येकाला शक्य नाही. आपल्याला नायक नायिकांचा प्रसिद्धी नाव पैसा एवढेच दिसते. त्या पाठीमागे त्यांनी केलेली मेहनत ठेवलेला संयम आणि कितीतरी गोष्टींचा त्याग आपल्याला दिसत नाही.

नायक नायिका अचानकपणे हिरो झालेले नाहीत. त्यांच्याही अनेक घरगुती समस्या असू शकतात. पण या सर्वांवर मात करून ते आपले मनोरंजन करत असतात. आणि म्हणूनच ते हिरो ठरतात. ते आपल्या वैयक्तिक दुःखाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करून आपल्या मनोरंजनासाठी जीवाची बाजी लावतात. बरं हे शूटिंगची कामं सुद्धा फार सोपी नाहीत. वेळेला आठ आठ तास उभे राहून काम करावे लागते. एखाद्या रोजंदाराप्रमाणे काम करावे लागते. तेव्हा कुठे पुढे जाऊन पैसा मिळतो. बरं ती ही कायमस्वरूपी शाश्वती नाही. जोपर्यंत काम चालू तोपर्यंत मीटर डाऊन. काम मिळणे बंद मीटर सुद्धा बंद. म्हणूनच नायक नायिका कायम नाविन्यपूर्ण प्रयोग करण्याच्या शोधात असतात. जेणेकरून लोकांना वेगळं आणि नवीन काहीतरी मिळेल

# म्हणून ते हिरो आहेत

आणि सतत काम मिळत राहील.

**निलेश साठे**

त्यांनी त्यासाठी खूप काबाड कष्ट घेतलेले असतात. त्यांचं स्वप्न असतं त्यांचे ध्येय असते. त्यांची चिकाटी असते. त्यांनी त्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतलेले असते. आणि त्या पदासाठी पात्र बनण्यासाठी चोहोबाजूने त्यांनी प्रयत्न केलेले असतात. फार पूर्वी माधुरी दीक्षित यांची एक टीव्हीला जाहिरात यायची. त्यात ती म्हणते लोकांना वाटते की, आम्ही फिल्मस्टार स्वाभाविकपणे सुंदर असतो आणि आम्हाला सुंदरतेबद्दल काळजी घ्यायची काहीच गरज नसते. परंतु सत्य तर हे आहे की आम्हाला जास्त काळजी घ्यावी लागते. ही जाहिरात एका साबणाची होती. म्हणजेच तुम्हाला कलेवर तर मेहनत घ्यावीच लागते परंतु सुंदर दिसण्यावर सुद्धा तुम्हाला मेहनत घ्यावी लागते. बरं ते सुद्धा तुमच्या आमच्यासारखे हाडामासाची माणसंच आहेत. त्यांना सुद्धा दुःख व्यथा वेदना आहेत. या सर्वांवर मात करून त्यांना इतरांपुढे आपली कला सादर करायची असते. फक्त त्यांच्या आजूबाजूचा झगमगाट न पाहता त्यांनी घेतलेल्या मेहनतीवर आपण लक्ष दिले पाहिजे.


लोकांचं मनोरंजन करणं वाटते तितकं सोपं काम नाही. लोकांना हसवता आलं पाहिजे, लोकांना रडवता आलं पाहिजे. लोकांना भावनिक करता आलं पाहिजे. परंतु म्हणतात ना एक वेळ लोकांना रडवणं सोपं आहे. परंतु लोकांना हसवणे खूपच कठीण काम आहे आणि हे कलाकार मंडळी अगदी लिलया ते काम करत असतात. ही कलाकार मंडळी जेव्हा लोकांचे मनोरंजन करत असतात तेव्हा त्यावेळेस त्या कलाकाराची मनस्थिती सर्वोत्तम असायला हवी. पण त्यावेळेस ती मनस्थिती मजबूत असेलच असं काही नाही. कारण तुमच्या आमच्या प्रमाणे ते सर्वसामान्य माणस आहेत त्यांनाही सुखदुःख आहेत. त्यांनाही व्यथा वेदना आहेत. त्यांनाही शारीरिक त्रास वेदना होत असतात.



कितीतरी नायक नायिका अशा आहेत ज्यांनी आपल्या व्यथा वेदनांना दूर सारून प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले आहे. त्यांनी आपल्या दुःखाचा बाऊ कधीच केला नाही. शारीरिक व्यथा वेदना विसरून लोकांचे मनोरंजन केले आहे. विशेष म्हणजे त्यांच्या वेदना लोकांना कधी दिसल्या सुद्धा नाहीत. काही नायकनायिका तर अशा आहे जे दुनिया सोडून गेले परंतु आपल्या वेदना कधी लोकांसमोर मांडल्या नाहीत. ते गेल्यानंतर लोकांना कळतं की यांना व्यथा होत्या, वेदना होत्या. कितीतरी नायकांनी आपल्या वैयक्तिक व्यथा वेदना विसरून लोकांचे मनोरंजन केले आहे. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील दुःखावर मात करून ते इतरांचे मनोरंजन करत राहिले म्हणूनच ते हिरो आहेत. आपलं सर्वसामान्यांचं थोडे जरी काय दुखलं खुपलं तर आपण त्याचा बाजार मांडतो. तसा बाजार हे नायक नायिका मांडत नाहीत. म्हणूनच ते हिरो आहेत. आपण समाजाला प्रेरणादायी ठरावं हे जवळजवळ प्रत्येक नाईक नायिकांना वाटत असतं. आता हेच पहा आपल्या लक्ष्मीकांत बेर्डे यांना असे म्हणतात की, किडनीचा त्रास होता पण त्यांना पडद्यावर पाहताना कधी आपल्याला जाणवलं सुद्धा नाही. शाहरुख खान यांना कंबरेच्या भयंकर वेदनाने त्रास दिला आहे. त्यांच्याही कंबरेचे ऑपरेशन झाले आहे. पण ते आपल्याला कधी दिसले आहे का. असे अजून बरेच नाईक नायिका आहे ज्यांनी आपले दुःख कधीही इतरांना जाणवू दिले नाही. वैयक्तिक व्यथा वेदना शारीरिक त्रासांवर मात करून आपले दुःख बाजूला सारून लोकांचे निखळ मनोरंजन करणाऱ्या त्या प्रत्येक हिरोला सॅल्यूट. ✻✻

### स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लुप्त्या व युक्त्या

# विभाज्यतेच्या कसोट्या






आकडेमोड
**राजेंद्र पाटील**
९८२२३०२०८५

शिष्यवृत्ती परीक्षेत गणित विषयात विभाज्यतेच्या कसोट्यांवर आधारित प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न अचूक सोडवायचे असतील तर आपल्याला विभाज्यतेच्या कसोट्यांचे नियम माहिती पाहिजेत. हे नियम आपल्याला माहित असतील तर कमी वेळात हे प्रश्न सोडविणे शक्य होते. अन्यथा विद्यार्थी गोंधळून जातात व त्याचा परिणाम त्यांच्या पेपरवर होऊन वेळ हातचा निघून जातो व पेपर पूर्ण होत नाही.

**व्याख्या :-** ''एखाद्या संख्येचे कोणकोणते विभाजक आहेत किंवा एखाद्या संख्येला कोणकोणत्या संख्येने निःशेष भाग जाऊ शकतो, हे प्रत्यक्ष भागाकार न करता ठरविण्यासाठी जी कसोटी वापरतात त्यांना विभाज्यतेची कसोटी असे म्हणतात.''

प्रत्येक शिक्षक मित्रांनी हे विभाज्यतेच्या कसोट्यांचे नियम प्रात्याक्षिकासह आपल्या विद्यार्थी मित्रांकडून घटवून घेतले पाहिजेत. म्हणजे आपल्या विद्यार्थी मित्रांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

काय आहेत विभाज्यतेच्या कसोट्या त्या आपण आता पाहू.

१) १ या संख्येने प्रत्येक संख्येला भाग जातो म्हणून १ ही संख्या सर्वच संख्यांची विभाजक असते. उदा.

अ १= अ
० १= ०
१२ १= १२
४४ १= ४४

२) प्रत्येक संख्येला स्वतःनेच भाग जातो म्हणून प्रत्येक संख्या स्वतःशीच विभाजक असते. उदा.

१२ १२= १
४८ ४८= १
२२ = १

१) २ ची कसोटी- ज्या संख्येच्या एकक स्थानी ०,२,४,६,८ यापैकी एखादा अंक असल्यास त्या संख्येला २ ने निःशेष भाग जातो.

उदा २५३४८, २२,१३६, २४१८, ५००००
वरील संख्यांच्या एकक स्थानी ०,२,४,६,८ हे अंक आहेत म्हणून या संख्यांना २ ने भाग जातो.

२) ३ ची कसोटी - दिलेल्या संख्येतील अंकांच्या बेरजेस ३ ने भाग जात असेल तर त्या संख्येस ३ ने भाग जातो.

उदा. ७५९ या संख्येतील अंकांची बेरीज ७+५+९=२१ म्हणून २१ ला ३ ने पूर्ण भाग जातो निःशेष भाग जातो.

३) ४ ची कसोटी - दिलेल्या संख्येतील शेवटच्या दोन अंकांनी तयार होणाऱ्या संख्येला ४ ने निःशेष भाग गेल्यास अथवा संख्येच्या शेवटी दोन्ही अंक शून्य असल्यास ४ या संख्येने निःशेष भाग जातो.

उदा. १९२८ या संख्येत एकक व दशक स्थानी २८ ही संख्या आल्याने ४ ने निःशेष भाग जातो.

४) ५ ची कसोटी- ज्या संख्येच्या एकक स्थानी ० किंवा ५ असतो त्या संख्येला ५ ने भाग जातो.

उदा. ४०,१४५,२००,९७५ या संख्यांना ५ ने निःशेष भाग जातो.

५) ६ ची कसोटी - ज्या संख्येस २ ने आणि ३ ने भाग जातो त्या संख्येस ६ ने निःशेष भाग जातो.

उदा. १) ९६ या संख्येस २ ने व ३ ने भाग जातो. म्हणून ६ ने ही भाग जातो.

२) ४८० या संख्येस २ व ३ ने भाग जातो म्हणून ६ ने ही भाग जातो.

६) ८ ची कसोटी - दिलेल्या संख्येतील शेवटच्या तीन अंकांनी तयार होणाऱ्या संख्येस ८ ने भाग गेल्यास पूर्ण संख्येला ८ ने भाग जातो.

उदा. ४०८ या संख्येला ८ ने भाग जातो म्हणून खाली दिलेल्या संख्यांना ८ ने भाग जातो.

उदा. १३४०८, २३४०८, ५९१४०८,२२९४०८

७) ९ ची कसोटी- ज्या संख्येच्या अंकातील बेरजेला ९ ने भाग जातो त्या पूर्ण संख्येलाही ९ ने निःशेष भाग जातो.

उदा. ९१८५४ स्पष्टीकरण ९+१+८+५+४=२७ ला ९ ने भाग जातो म्हणून वरील संपूर्ण संख्येला ९ ने भाग जातो.

८) १० ची कसोटी - दिलेल्या संख्येच्या एकक स्थानी ० असेल तर त्या संख्येला १० ने निःशेष भाग जातो.

उदा ५०,१९१०,१२५००,१०९१०१०

या सर्व अंकांच्या एकक स्थानी ० हा अंक आहे . म्हणून १० ने निःशेष भाग जातो.

९) ११ ची कसोटी - दिलेल्या संख्येतील एका आड एक येणाऱ्या (सम व विषम स्थानातील) सर्व अंकांची बेरीज करून त्यांची वजाबाकी जर ० किंवा ११ च्या पटीत येत असेल तर त्या संपूर्ण संख्येला ११ ने भाग जातो.

१. उदा १५६७२८
विषम स्थानच्या अंकांची बेरीज ८+७+५= २०
सम स्थानच्या अंकांची बेरीज २+६+१ = ९
फरक २०-९ = ११ म्हणून म्हणून या संख्येला ११ ने निःशेष भाग जातो.

२. उदा. २५८९४
समस्थानच्या अंकांची बेरीज ५+९=१४
विषमस्थानच्या अंकांची बेरीज २+८+४=१४
फरक-१४ = ० सम आणि विषम स्थानच्या अंकांतील फरक ० आहे म्हणून या संख्येला ११ ने निःशेष भाग जातो.

१०) १२ ची कसोटी-दिलेल्या संख्येला ३ व ४ या संख्यांनी भाग जात असल्यास त्या संख्येला १२ ने निःशेष भाग जातो.

उदा ९२४ या अंकांची बेरीज ९+२+४= १५ ला ३ ने भाग जातो तसेच एकक दशक स्थानामुळे तयार झालेल्या संख्येला ४ ने भाग जातो म्हणून वरील पूर्ण संख्येला १२ ने भाग जातो.

११) १५ ची कसोटी - ज्या संख्येला ३ व ५ या दोन्ही संख्यांनी पूर्ण भाग जातो त्या संख्येला १५ ने पूर्ण भाग जातो. उदा. ११२३५

१२) ३६ ची कसोटी - ज्या संख्येला ९ व ४ या दोन्ही संख्यांनी पूर्ण भाग जातो त्या संख्येला ३६ ने पूर्ण भाग जातो. उदा. ७४१२४

वरीलप्रमाणे विभाज्यतेच्या कसोट्यांचे नियम स0त्रे माहिती असणे आवश्यक आहे. **

# धावीर महाराजांचा पालखी सोहळा



शब्दगंधा
**शशिकांत मुद्देबिहाळकर**

रायगड जिल्ह्यातील रोहा या नगरीच्या ग्रामदैवत असलेल्या धावीर महाराजांचा पालखी सोहळा हा एक अवर्णनीय असा सोहळा असतो. रोहेकरांसाठीही दिपावलीपेक्षाही जास्त भाऊक आणि आनंदाची पर्वणी असते. ''दसरा, नाही आनंदा तोटा'' या सणापासून या आनंदाच्या पर्वणीला प्रारंभ होतो तो धावीर देवाच्या पालखी सोहळ्याच्या दिवशी या पर्वणीची सांगता होते.

हा एक नवरात्र सोहळा असतो. नवरात्रीचे घट बसतात त्याच दिवशी या धावीर महाराजांच्या देवत्वाचे, घट बसतात. देवाला सालंकृत सजविले जाते. चांदीच्या मुकुटाचा साज चढविला जातो. फुलांनी गाभारा भरला जातो. मंदिरातील गाभाऱ्यात देव विराजमान होतात. देवाचे रूप तसे ऊग्र आहे, जणू शिव शंकराचा रुद्रावतार. जणू एखाद्या राज्याचा राजा राजेश्वर! म्हणूनच या देवाचे नामकरण ''धावीर महाराज'' असे केले असावे. हा कृपाळू राजा या नगरीचे संरक्षण करण्यार्थ दररोज पहाटे पांढऱ्या शुभ्र अश्वावरून नगरीच्या संरक्षणार्थ फेरफटका मारीत असे अशी आख्यायिका आहे. गावाच्या उत्तर दिशेला दूर धावीराचे मंदिराचे स्थान आहे.



दर रविवारी या देवाच्या दर्शनाला भाविक गर्दी करतात. काही भाविक रविवारचे उपवास धरतात. या देवावर गावातील सर्वच लोकांची अत्यंतिक श्रद्धा आहे. मी १९७१, साली या गावात आलो तेव्हा हे मंदीर एक साधे मंदीर होते. दिवसागणिक मंदिराचा जीर्णोद्धार होत गेला. आज देवाचे एक भव्य सुंदर मंदीर दिमाखात उभे आहे. शासनामार्फत या मंदिराचे सुशोभिकरण करणयात आले आहे. सभोवार हिरवळीने आच्छादलेले पटांगण आहे. सुंदर बाग बगीचा आहे. या देवाचे वैशिष्ट्य असे की ब्रिटीश कालापासून या देवाची दखल शासन दरबारी घेण्यात आली आहे. नवरात्र अखेर दसऱ्याच्या दुसऱ्याच दिवशी धावीर देवाच्या पालखीचा सोहळा असतो. भल्या पहाटे देव उठतात आणि नगरीतील समस्त भाविकांना दर्शन देणयासाठी बाहेर पडतात. भक्तांच्या घरोघरी जाऊन भक्तांना दर्शन देतात ही परंपरा शेकडो वर्षाची आहे. देव बाहेर पडताना त्यांना ब्रिटीश कालापासून पोलिस दलामार्फत मानाची सलामी देणयात येते आणि भकतगण मोठ्या संख्येने या सलामी सोहळ्याच्या दर्शनार्थ उपस्थिती लावतात.

हा देखणा सोहळा पार पडल्यावर सर्व भक्तांसमवेत देवांचा नगर भ्रमण सोहळा सुरू होतो. पालखीतून विराजमान होऊन देव भक्तगणांसह नगरीच्या चौफेर ठायी ठायी थांबून भक्तांना दर्शन देतात. त्यावेळी देवाचे आरत्यांनी औक्षण केले जाते. रांगोळ्यांनी देवांचे मार्ग सजविले जातात. कमानी उभारल्या जातात. नवी वस्त्रे परिधान करून नागरिक देवाच्या दर्शनार्थ रात्री उशिरापर्यंत सज्ज असतात. हा सोहळा देव बाहेर पडतात त्या क्षणापासून अखंड सुमारे तीस तास चालू राहतो. देवांना परत मंदिरात जाण्यास दुसऱ्या दिवशी दुपारचे बारा वाजतात. हा लेख लिहित असताना पालखीचे आगमन अद्याप मंदिरात झाले नसावे. देव मंदिरात विराजमान होत असताना मानकऱ्यांचा सत्कार सोहळा पार पडतो. देव देवळात विराजमान होतात.

हा सोहळा लहान थोरांसाठी एक सुसंपन्न सोहळा असतो. येथे भिकारी, फेरीवाले, यांचा ओंगळवाणा प्रकार दिसत नाही. भक्तिमय वातावरणाने आसमंत उजळून निघालेला असतो. यावर्षी पावसाच्या धारांनीही सोहळ्यात हजेरी लावली, तरीही भक्तगणांसह तोही आनंदाने सोहळ्यात सामील झाला. रोह्याचे ग्रामदैवत धावीर महाराज रोहेकरांसाठी देवाधिदेव आहेत हे सोहळ्याची संपन्नता बघून मन नतमस्तक होते. **

# कोण आहेत ज्ञानेश महाराव ?

**आज आपल्या देशामध्ये जे काही प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकार आहेत, त्यापैकी ज्ञानेश महाराव हे एक आहेत. अंधश्रद्धा, प्रतिगामीवृत्ती याविरुद्ध ते लेखणीचे शस्त्र करून अनेक वर्षापासून लढत आहेत. कदाचित त्यांना कल्पनाही नसेल इतके विद्यार्थी त्यांच्या मुक्त विद्यापीठातून तयार झालेले आहेत. आता ते जगभरातील विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. गेल्या तीस वर्षातील महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय घडामोडींमध्ये चित्रलेखाचा अर्थात ज्ञानेश महाराव यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.**

**डॉ.श्रीमंत कोकाटे**



महाराष्ट्रातील असंख्य तरुणांची जडण घडण करण्यात अनेक संशोधक, विचारवंता प्रमाणे चित्रलेखाचे निवृत्त संपादक ज्ञानेश महाराव यांचा सिंहाचा वाटा आहे. मी स्वतः १९९९ सालापासून चित्रलेखाचा नियमित वाचक आहे. गेल्या तीस वर्षातील महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय घडामोडींमध्ये चित्रलेखाचा अर्थात ज्ञानेश महाराव यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

चित्रलेखाने महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक कार्य केलेले आहे. याचे श्रेय ज्ञानेश महाराव यांना जाते. अभ्यासूवृत्ती, निर्भीडपणा, प्रामाणिकपणा, ज्या त्या वेळेस योग्य भूमिका घेण्याची हिम्मत, भाषेतील सत्यनिष्ठा आणि प्रखरता हे त्यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये आहेत. महाराव म्हणजे करारी बाणा आणि लेखणीचा राणा आहेत. लेन प्रकरण २००३ साली घडले, कोंडदेव पुतळा प्रकरण २०१० साली घडले, पुरंदरे पुरस्कार प्रकरण २०१६ साली घडले, कोरेगाव भीमा प्रकरण २०१८ साली घडले, महाराव यांनी त्याच वेळेस भूमिका घेतली, समोर प्रकरणं घडत असताना ते शांतपणे बघत बसले नाहीत.

आज आपल्या देशामध्ये जे काही प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकार आहेत, त्यापैकी ज्ञानेश महाराव हे एक आहेत. अंधश्रद्धा, प्रतिगामीवृत्ती याविरुद्ध ते लेखणीचे शस्त्र करून अनेक वर्षापासून लढत आहेत. कदाचित त्यांना कल्पनाही नसेल इतके विद्यार्थी त्यांच्या मुक्त विद्यापीठातून तयार झालेले आहेत. आता ते जगभरातील विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून प्रबोधन करत असताना त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले पण ते निराश झाले नाहीत, आणि विशेषतः आपल्यावर आलेल्या संकटाचे त्यांनी कधी खासगी आणि सार्वजनिक जीवनात भांडवलदेखील केले नाही.

ज्ञानेश महाराव हे जसे उत्तम पत्रकार आहेत तसेच ते उत्तम नाटककार आहेत, त्यांनी जिंकू या दाही दिशा, घालीन लोटांगण आणि संत तुकाराम (संगीत) ही तीन नाटके मराठी जनांना दिली. जिंकू या दाही दिशा च्या माध्यमातून शिवराय ते फुले, शाहू, आंबेडकर ही विचारधारा जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. विनोदाबरोबर प्रबोधन त्यांनी केले. संत तुकाराम महाराजांची प्रेमळ, मायाळू तशीच क्रांतिकारक प्रतिमा संगीत नाटकातून त्यांनी मांडली. त्या नाटकात त्यांनी तुंबाजीची अफलातून भूमिका केलेली आहे. हजरजबाबीपणा हे त्यांच्या भूमिकेचे वैशिष्ट्य आहे. यातून त्यांनी बुवाबाजीवर कडाडून प्रहार केलेला आहे. ते जसे गंभीरपणे लिहितात, तसेच विनोदातूनदेखील प्रबोधन करतात.

ते उत्तम गायकदेखील आहेत. शास्त्रीय संगीतामध्ये ते पारंगत आहेत. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले आहे. ते बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. तरीदेखील अतिव ध्येयवादातून आणि कर्तृत्वातून येणारा अहंकार त्यांच्याकडे नाही, महारावांना खोटारडेपणा अजिबात आवडत नाही. हे त्यांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. महाराव हे योग्य वेळी अचूक भूमिका घेणारे पत्रकार आहेत. कोणाला काय वाटेल म्हणून सत्य लपवून असत्याची पाठराखण त्यांनी कधी केली नाही.

जेम्स लेन प्रकरणाच्या वेळेस अनेक विचारवंत, पत्रकार, लेखक, संशोधक मूग गिळून गप्प बसले होते. काही पत्रकारांनी तर विकृत लोकांची बाजू घेतली होती. हा संवेदनशील विषय आहे, म्हणून खासगीत कुजबुज करून लेनवाद्यांपुढे गर्भगळीत झाले होते. अशा काळात ''शिवरायांच्या बदनामीचे विदेशी पुस्तक, स्वदेशी मस्तक'' अशा मथळ्याखाली लेख लिहून लेनवाद्यांना चव्हाट्यावर आणून शिवरायांचा सन्मान करण्याचे ऐतिहासिक काम महारावांनी केले. लेनवाद्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून त्यांची विषारी तोंड बंद केली. २००५ साली लेनवाद्यांच्या आश्रयदात्यांना दोन वेळा सत्तेपासून रोखण्याचे श्रेय ज्ञानेश महाराव यांना द्यावे लागेल. या घटनेने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि संशोधनाच्या क्षेत्रात दूरगामी परिणाम झाले. तरुणांमध्ये जाण, भान आणि ज्ञान आले, याचा पाया एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात महारावांनी घातला, असे म्हणावे लागेल.

२००५ साली महाराष्ट्रात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता येण्याची सुतराम शक्यता नव्हती. भाजप सेनेच्या आक्रमणापुढे त्यांनी माना टाकल्या होत्या. लेनप्रकरणी वाजपेयी-अडवाणी-ठाकरे यांच्या भूमिकेमुळे महाराष्ट्र संतापला होता. ज्ञानेश महाराव यांनी त्या सर्वांची लेखणीतून आणि सभांमधून चिरफाड केली. त्यांची या विषयावरील बिंदू चौक (कोल्हापूर) येथील सभा विशेषतः खूप गाजली.

सुरुवातीला भांडारकरी लोकांच्या बाजूने उभे असणारे तत्कालिन गृहमंत्री आर. आर. पाटील हे महाराव यांच्या सत्यवादी भूमिकेमुळे जागे झाले आणि ते महारावांची भूमिका मांडू लागले. त्यावेळेस महाराव यांनी आर. आर. पाटील यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांना विषय समजावून सांगितला, अनेक संदर्भ दिले. साहजिकच याचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला २००५ च्या विधानसभा निवडणुकीत खूप झाला. जाणारी सत्ता महाराव यांच्या लेखणीमुळे त्यांना मिळाली. पण प्रामाणिक पुरोगामी संपादक असणाऱ्या महाराव यांची बाजू घ्यावी, त्यांना राज्यसभेवर किंवा विधानपरिषदेवर पाठवावे, असे आघाडीवाल्यांना वाटत नाही. कदाचित कामाच्या व्यापामुळे ते विसरले असतील.

लेनचे समर्थन करणाऱ्या कुमार केतकरांना काँग्रेसने खासदार केले. शिवरायांचा सन्मान करून राष्ट्रवादी काँग्रेसला व काँग्रेसला सत्तेपर्यंत पोचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महारावांना काँग्रेस-राष्ट्रवादीने काय दिले? जीवावर उदार होऊन पुरोगामी भूमिका बजावणाऱ्या लेखक, पत्रकार, विचारवंत महाराव यांच्याप्रती काँग्रेस-राष्ट्रवादीची भूमिका कृतघ्नपणाची आहे. नवसरंजामदार सत्तेतील मराठा नेत्यांना सत्ता गेली की शिव, फुले, शाहू, आंबेडकर, पुरोगामी चळवळी आठवतात, आणि सत्ता आली की मुलगा, मुलगी, नातू, जावई, व्याही आठवतात. भाजपवाले त्यांच्या विकृत व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. उदाहरणार्थ पुरंदरे. काँग्रेस-राष्ट्रवादीवाले सुसंस्कृत विचारवंताच्यादेखील पाठीशी उभे राहत नाहीत. उदाहरणार्थ महाराव, दादोजी कोंडदेव पुतळा हटवावा प्रकरण, राम गणेश गडकरी पुतळा प्रकरण, बाबासाहेब पुरंदरे महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रकरण, कोरेगाव भीमा दंगल प्रकरण इत्यादी विषय महारावांनी योग्य पद्धतीने मांडले, त्यामुळे आतापर्यंत महाराष्ट्र दंगलग्रस्त होण्यापासून वाचलेला आहे. महाराव सतत भूमिका घेत असतात.

पुरंदरे विरोधी शिवसन्मान जागर परिषदांवेळी ज्ञानेश महाराव, डॉ.जितेंद्र आव्हाड, प्रा.प्रतिमा परदेशी आणि सदर लेखाचे लेखक यांनी कोणत्याही स्वरूपाचे मानधन किंवा प्रवास खर्च न घेता, महाराष्ट्रभर सुमारे पन्नास शिवसन्मान जागर परिषदा घेतल्या. ज्ञानेश महाराव यांनी तर त्यांना मुंबईत मिळालेल्या एका पुरस्काराची रक्कम कोल्हापूर येथील शिवसन्मान जागर परिषदेच्या संयोजकाकडे सुपूर्त केली. हजारो रुपये मानधन घेऊन संयोजकांना छळणारे वक्ते कमी नाहीत, पण स्वतःच्या खिशातील पैसे संयोजकांना देणारा वक्ता कधी आपण पाहिला आहे का? त्या वक्त्याचे नाव आहे ज्ञानेश महाराव!

कोरेगाव भीमा प्रकरणाच्या माध्यमातून मराठा विरुद्ध बौद्ध अशी दंगल घडविण्याचा प्रतिगाम्यांचा डाव ज्ञानेश महाराव यांनी लेखमालेतून हाणून पाडला. त्यावेळेस खूप कठीण परिस्थिती होती. भूमिका घेण्यास अनेक लोक कचरत होते. पण महारावांनी कोणाचाही मुलाहिजा न बाळगता वास्तववादी भूमिका मांडली. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठा अनर्थ टळला. आजच्या काळात शब्द हेच शस्त्र आहे, हे ओळखून मराठी भाषेची आणि तुकोबा-ज्योतिबा यांच्या विचारांची इमानेइतबारे सेवा करणारे महाराव हे भाषाप्रभू आहेत.

ज्ञानेश महाराव हे केवळ पत्रकार नाहीत, तर ते उत्तम नाटककार आहेत. त्यांनी अनेक नाटकं लिहिली. त्या नाटकांचे शेकडो प्रयोग झाले. त्या नाटकात त्यांनी भूमिका केल्या. संत तुकाराम महाराज नाटकातील तुंबाजीची भूमिका त्यांनी अफलातून केली. ते उत्तम शाहीरदेखील आहेत. ते उत्तम लेखक आहेत. समाजजागृती करणारी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. ते उत्तम गायक आहेत. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले आहे. ते उत्तम वक्ते आहेत. त्यांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरदेखील अनेक सभा गाजवलेल्या आहेत. दुबई येथे प्रतिवर्षी होणाऱ्या शिवजयंतीसाठी ते प्रमुख वक्ते होते.

ज्ञानेश महारावांच्या परखडपणामागे कोणाबद्दल असूया नाही, कोणाबद्दलही द्वेष नाही, आत एक बाहेर एक अशी त्यांची वृत्ती नाही, लॉबिंग करून कोणाला छळण्याची क्रूर मनोवृत्ती नाही, आपल्या वैचारिक विरोधकांशीही अत्यंत सहृदय अंतकरणाने सुसंवाद करणारे अत्यंत मानवतावादी पत्रकार, लेखक, नाटककार, संगीततज्ञ, प्रभावी वक्ते आणि कलाकार म्हणजे ज्ञानेश महाराव आहेत. त्यांनी हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठे प्रबोधन केलेले आहे. धर्मात चिकित्सेला वाव असला तरच धर्म लोककल्याणकारी होतो, तरच धर्म वृद्धिंगत होतो. महाराव यांच्या प्रबोधनामुळे हिंदू धर्माचे कल्याणच झालेले आहे, नुकसान झालेले नाही. महाराव हे हिंदू धर्माचे शत्रू नाहीत, तर ते धर्माचे सुधारणावादी आहेत.

वैचारिक मतभिन्नता असू शकते, ती कुटुंबातदेखील असते, समाजात तर असणारच, वैचारिक मतभिन्नतेचे भारतीय संविधानानेदेखील स्वागतच केलेले आहे. एखाद्या व्यक्तीचे वैचारिक मत मान्य नसेल तर त्याचा प्रतिवाद करण्याचीदेखील एक शास्त्रशुद्ध पद्धती भारतीय लोकशाहीमध्ये आहे, परंतु आपले मत मान्य नसणाऱ्याच्या घरात किंवा कार्यालयात घुसून त्याच्या मनामध्ये दहशत निर्माण करणे, दमदाटी करणे हे मात्रा झुंडशाहीचे अर्थात हुकूमशाहीचे लक्षण आहे. लोकशाहीमध्ये विचारवंत, लेखक, कलाकार, यांच्यावर अन्याय झाला तर विरोधी पक्षाने त्याविरुद्ध आवाज उठवायचा असतो, महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेत्यांनी महारांवाबाबत हा लोकशाही संकेत पाळला नाही.

ज्ञानेश महाराव यांनी संपूर्ण आयुष्य संशोधन, लेखन, वाचन, प्रबोधन, पत्रकारिता, नाट्यलेखन, अभिनय, गायन यासाठी समर्पित केलेले आहे. त्यांनी कायम लोकशाही संविधानिक मूल्ये जपलेली आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक पिढ्या घडवल्या. त्यांच्या कामाचा पूर्ण फायदा महाविकास आघाडीला झालेला आहे, परतु परवा त्यांना एकट्याला गाठून धर्मांधांनी त्यांना दमदाटी केली, एकट्याला गाठून दमदाटी करण्यात शौर्य नसते, ज्ञानेश महाराव अशा दमदाटीला घाबरणारे नाहीत. ते निराश होऊन घरात बसणारेदेखील नाहीत, परंतु खंत याची वाटली की महारावामुळे ज्या राजकीय पक्षांना खूप मोठा फायदा झाला, ते मात्र त्यांच्या बाजूने पुढे आले नाहीत.

महारावांनी आयुष्यभर प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपला, पण त्यांच्या संकट काळात त्यांच्या हाकेच्या अंतरावर असणारे प्रबोधनकार ठाकरे यांचे दोन्ही नातू उद्धव आणि राज ठाकरे हे महारावांच्या मदतीला अजून धावून आले नाहीत. विकृत, शिवद्रोही गिरीश कुबेरला संभाजी ब्रिगेडने काळे फासल्यावर निषेध करणाऱ्या काँग्रेस राष्ट्रवादीच्या एकाही जबाबदार नेत्याने पुढे येऊन महाराव सरांना झालेल्या दमदाटीचा एका शब्दानेदेखील निषेध केला नाही! कृतघ्न कुठले! **

# दुसऱ्या डावात भारताची आघाडी

## ■ सर्फराजच्या बॅटने मैदान गाजवले

**। बंगळुरू । वृत्तसंस्था ।**
**भारतीय क्रिकेट संघाने बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटीत दुसऱ्या डावात दमदार पुनरागमन केले. या सामन्यात पहिल्या डावावर न्यूझीलंडचे वर्चस्व दिसले, तर दुसऱ्या डावात भारतीय संघाचे काही प्रमाणत वर्चस्व राहिल्याचे दिसून आले. या सामन्यात भारतासाठी दुसऱ्या डावात सर्फराज खान आणि ऋषभ पंत यांनी दमदार दीडशतकी भागीदारी केली. या दोघांच्या भागीदारीमुळे भारताला दुसऱ्या डावात आघाडी घेण्यात यश मिळाले आहे.**



या सामन्यात भारतीय संघ पहिल्या डावात ४६ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा केल्या आणि ३५६ धावांची आघाडी घेतली होती. परंतु, दुसऱ्या डावात सर्फराज खान आणि ऋषभ पंत यांनी दमदार फलंदाजी केली. भारतासाठी यशस्वी जैस्वाल (३५) आणि कर्णधार रोहित शर्माने (५२) चांगली सुरुवात करून दिली होती. हे दोघे बाद झाल्यानंतर सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सर्फराजने विराट कोहलीसह १३६ धावांची भागीदारी करत भारतीय डावाला स्थैर्य दिले होते. परंतु, विराट ७० धावांवर बाद झाला. यानंतर चौथ्या दिवशी म्हणजे शनिवारी (दि.१९) सर्फराजला पंतने चांगली साथ दिली. या दोघांनीही काही आक्रमक शॉट्स खेळले. यासह ११० चेंडूत आधी सर्फराजने शतक केले, तर नंतर १९४ चेंडूत त्याने १५० धावा पूर्ण केल्या. मात्र, दीडशे धावा पूर्ण करताच सर्फराज ८५ व्या षटकात टीम साऊदीच्या गोलंदाजीवर अजाज पटेलकडे झेल देत बाद झाला. त्याने १९५ चेंडूत १८ चौकार आणि ३ षटकारांसह १५० धावा केल्या. सर्फराज आणि पंत यांच्यात १७७ धावांची भागीदारी झाली.

सर्फराज बाद झाल्यानंतरही पंत चांगला खेळत होता. त्याला केएल राहुलने साथ दिली होती. यानंतर पंतही त्याचे शतक पूर्ण करेल असे वाटत होते. मात्र, ८९ व्या षटकात विल्यम ओरुर्कीने त्याला ९९ धावांव असताना क्लिनबोल्ड केले. त्याने १०५ चेंडूत ही खेळी करताना ९ चौकार आणि ५ षटकार मारले. यावेळी लोकेश राहुल (१२) मिळालेल्या संधीवर पुन्हा अपयशी ठरला आणि भारताला ४३८ धावांवर सहावा धक्का बसला.

यानंतर रवींद्र जडेजा देखील (५) अपयशी ठरला, परंतु आर अश्विनने काही सुरेख फटके मारून आशा पल्लवीत केल्या होत्या. तेव्हा किवींनी गोलंदाजीत बदल करताना मॅट हेन्रीला आणले आणि त्याने अश्विनला (१५) पायचीत पकडले. अम्पायर कॉलमुळे आर अश्विन बाद ठरला. पाठोपाठ हेन्रीने भोपळ्यावर जसप्रीत बुमरहाला बाद केले. मोहम्मद सिराजही शून्यावर बाद झाल्याने भारताचा दुसरा डाव ४६२ धावांवर गडगडला आणि न्यूझीलंडसमोर १०७ धावांचे आव्हानच भारताला ठेवता आले.

## ईश्वरी, तेजस्विनीची महाराष्ट्र संघात निवड





**। नाशिक । प्रतिनिधी ।**
नाशिकच्या ईश्वरी सावकार व तेजस्विनी बाटवाल या दोन क्रिकेटपटूंची वरिष्ठ महिला महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळातर्फे आयोजित कोलकता येथील वरिष्ठ महिला टी-२० स्पर्धेत या दोघी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ईश्वरी व तेजस्विनीने यापूर्वीदेखील महाराष्ट्रातर्फे वरिष्ठ व एकोणीस वर्षांखालील तसेच विविध वयोगटात महिला क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

ईश्वरी सावकारने १९ वर्षांखालील महाराष्ट्राचे कर्णधारपद भूषविले आहे. २०२३ मध्ये झालेल्या महिलांच्या २३ वर्षांखालील वयोगटात नॅशनल क्रिकेट अकादमीच्या राष्ट्रीय पातळीवरील हाय परफॉर्मन्स शिबिरासाठी तिची निवड झाली होती. याआधीच्या दोन हंगामात शिबिरात तिची निवड झालेली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये महिला टी-२० सामन्यांच्या चॅलेंजर ट्रॉफीसाठी १९ वर्षांखालील इंडिया 'अ' संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली होती. या स्पर्धेत श्रीलंका, वेस्ट इंडिज संघाविरुद्ध सामने झाले होते. तेजस्विनी बाटवाल यष्टीरक्षक व फलंदाज असून तिने यापूर्वी महाराष्ट्रातर्फे १९ वर्षांखालील तसेच विविध वयोगटात प्रतिनिधित्व केले आहे. यापूर्वीच्या हंगामात राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्पर्धेतील या खेळाडूंची सातत्यपूर्ण, लक्षणीय कामगिरी विचारात घेऊन निवड झाली आहे.

पुणे येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने सोळा सदस्य संघाची निवड घोषित केली आहे. अनुजा पाटील ही कर्णधार आहे.

## न्युझीलंडची अंतिम फेरीत धडक

# रविवारी द. अफ्रिकेसोबत भिडणार

**। दुबई । वृत्तसंस्था ।**
महिला टी-२० विश्वचषकच्या अंतिम फेरीतील दोन्ही संघांची नावे समोर आली आहेत. ऑस्ट्रेलियाला पराभूत करून आधीच अंतिम फेरीत पोहोचलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा रविवारी (दि.२०) दोन वेळा अंतिम फेरीत आलेल्या न्यूझीलंडशी सामना होणार आहे. न्यूझीलंडने २०१६च्या विश्वविजेत्या वेस्ट इंडिजचा उपांत्य फेरीच्या सामन्यात ८ धावांनी पराभव करून अंतिम फेरीचे तिकीट बुक केले. २०१० नंतर प्रथमच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्यात न्यूझीलंड संघाला यश आले आहे. आता यावेळी जगाला एक नवीन टी-२० विश्वचषक चॅम्पियन संघ मिळणार आहे. कारण हे दोन्ही संघ अद्याप विजेतेपद जिंकलेले नाहीत.

टॉस जिंकून पहिल्या डावात फलंदाजी करताना न्यूझीलंडला ९ गडी गमावत केवळ १२८ धावा करता आल्या. यामध्ये डिआंड्रा डॉटिनने २२ चेंडूत ३३ धावांचे योगदान दिले. तर, धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचा संघ २० षटकांत ८ गडी गमावून १२० धावाच करू शकला. ऑफस्पिनर कार्सनने २९ धावांत तीन बळी घेतले. तर, केरने चार षटकांत १४ धावांत दोन बळी घेतले आहेत.




## रायगडचा पहिला विजय

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित पंधरा वर्षाखालील मुलांच्या अंतर जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेतील पहिल्या साखळी फेरीच्या सामन्यात रायगडच्या संघांनी पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळवला आहे. दक्षिण झोन विरूद्ध झालेल्या सामन्यात रायगडच्या विनय शिर्केनी भेदक गोलंदाजी करत दक्षिण झोन संघाचा अवघ्या ७१ धावसंख्येवर डाव गुंडाळला. यात विनय शिर्के यांनी ५ फलंदाज बाद केले. त्याला दुसऱ्या बाजूने उदय जोहल यांनी ३ व आदित्य भारती यांनी २ फलंदाज बाद करत साथ दिली.

प्रतिउत्तर देताना रायगडच्या पवन दामगुडे यांनी ३४ तर मधल्या फळीत श्रेय पाटील यांनी ३० धावांचे योगदान संघाला दिले. दुसऱ्या दिवसाअखेर रायगडच्या संघाने २५ षटकांमध्ये सहा गडी गमावत ९१ धावा फलकावर लावल्या. सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया गेला असल्याने सामना पहिल्या डावाच्या आघाडीवर रायगडने जिंकला.

यावेळी, रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यासह सर्व कमिटी सदस्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

**रायगडचा संघ** :- पृथ्वीराज जावके (कर्णधार), भावेश जाधव, पवन दामगुडे, रुद्र घासे, तनिष्क बिले, हर्षित सिंग, श्रेय पाटील, अंहिक मानकामे, अर्णव साळवी, विनय शिर्के, उदय जोहाल, आदित्य भारती, सुदीप रॉय, आर्यन जोशी. राखीव खेळाडू- दिव्यांश चौधरी, सौऱ्याश कर, रिषभ ठाकूर, विराट पाटील, इशन पाठक, इम्मौद्दिन शेख.

## जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**
रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजित केलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला खारघर येथील बी.पी पाटील व घरत मैदानांवर प्रारंभ करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील एकूण २४ अकॅडमी व क्लबच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे.



जिल्ह्यातील २४ संघांना विविध गटात समाविष्ट करण्यात आले असून स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार खेळवण्यात येणार आहेत. ही क्रिकेट स्पर्धा ४० षटकांची एकदिवसीय निवड चाचणी स्पर्धा आहे. या स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारावर संघाची निवड करण्यात येणार आहे. पुढे निवडलेला रायगड जिल्हाचा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित अंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यात स्पोर्टी-गो क्रिकेट अकॅडमी कळंबोली संघाने क्रिकेट अकॅडमी ऑफ पठाण संघावर ५ गडी राखून विजय मिळवला आहे. यामध्ये स्पोर्टी-गो संघाचा वरद वासकर यांनी ४ गडी बाद केले. तर, अज्रिब शेख यांनी ५४ धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला. दुसरा सामना प्रो किंग्ज क्रिकेट अकॅडमी विरूद्ध मोरया क्रिकेट अकॅडमी यांच्यात झाला. यामध्ये प्रो किंग्ज संघाने ५ गडी राखून सामना जिंकला आहे. आयुष माळी यांनी स्पर्धेतील पाहिले शतक झळकावले असून अवघ्या ६८ चेंडूनमध्ये १०१ धावा काढला आहेत. तर, कर्णधार राहुल प्रजापती यांनी ५ फलंदाज बाद करून संघाला विजय मिळवून दिला.

यावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असिसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रो-कबड्डी लीगला सुरूवात

**हैद्राबाद :** प्रो-कबड्डी लीगची शुक्रवारी (दि.१८) दिमाखात सुरुवात झाली आहे. या हंगसमातील पहिलाच सामना हैद्रबाद येथे तेलुगू टायटन्स आणि बेंगलुरु बुल्स यांच्यात रंगला. तेलुगू टायटन्सचा कर्णधार पवन सेहरावत होता. तर, बेंगलुरु बुल्सचा कर्णधार परदीप नरवाल होता. मागच्या पर्वात तेलुगू टायटन्स हा संघ गुणवत्ता यादीत शेवटच्या स्थानावर होता. मात्र, शुक्रवारी झालेल्या पहिल्याच सामन्यातील विजय त्यांच्यासाठी आशादायी ठरू शकतो. या सामन्याची विशेष बाब म्हणजे प्रो कबड्डीमधील दोन उत्कृष्ट खेळाडू पवन सेहरावत आणि परदीप नरवाल आमनेसामने होते.

## वीर वाजेकर महाविद्यालयाचे यश

**। उरण । वार्ताहर ।**
मुंबई विद्यापीठांतर्गत अॅथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन मरीन लाईन्स येथील मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल येथे दि.१६ व १७ ऑक्टोबर रोजी पार पडल्या. या स्पर्धेत उरण मधील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या अॅथलेटिक्स स्पर्धेमध्ये वैयक्तिक १० हजार आणि ५ हजार मीटर धावणे स्पर्धेत मृणाल मनोहर सरोदे प्रथम, तर १० हजार आणि ३ हजार मीटर धावणे ट्रिपल चेस स्पर्धेत प्रेम संतोष ठाकुर याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे.पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




## सिंधूची उपांत्यपूर्व फेरीत हार

**। ओडेन्स । वृत्तसंस्था ।**
बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूची डेन्मार्क खुल्या स्पर्धेतील घोडदौड उपांत्यपूर्व फेरीत खंडित झाली आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणाऱ्या जॉर्जिया टुनजुंगने सिंधूचा प्रतिकार २१-१३, १६-२१, २१-९ असा मोडीत काढला. जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असणाऱ्या इंडोनेशियाच्या टुनजुंगला यापूर्वी सिंधूविरुद्ध झालेल्या १२ लढतींत केवळ दोनच विजय मिळवता आले होते. यावेळी तिने तिसऱ्या विजयाची भर घातली. सिंधूने दुसरा डाव जिंकून रंगत आणली असली, तरी पूर्ण लढतीत टुनजुंगने वर्चस्व दिसून आले.

# अॅथलेटिक्स स्पर्धेत खोपोलीचे यश

**। उरण । वार्ताहर ।**
मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन झोन-१ च्या अॅथलिटिक्स स्पर्धा १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी मरीन लाइन्स येथील मुंबई विद्यापीठ क्रीडांगणावर संपन्न झाल्या. या स्पर्धेत के.एम. सी. महाविद्यालयातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून यश संपादन केले आहे.




या स्पर्धेत साहिल विचारे, प्रणव सावंत, सुजल घरत, विकास थिकडे, तुषार मेठल, साहिल धायगुडे यांनी ४०० मीटर रिले स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. पूर्वा जाधव, मुस्कान खान, साक्षी गुप्ता, शर्वरी शेवाळे, साक्षी गुप्ता, पायल पटेल यांनी ४०० मीटर रिले स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले आहे. तर, साहिल विचारे, सुजल मेठल, प्रणव सावंत, मुस्कान खान, पूर्वा जाधव यांनी १०० मीटर मिश्र रिले स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले आहे. तसेच, वैयक्तिक स्पर्धेत गौरव गुरुमकर याने उंचउडीत कांस्यपदक, पूर्वा जाधवने ८०० मीटर धावणेत रौप्यपदक व ४०० मीटर धावणेत कांस्यपदक, ईशा देशमुखने १० किलोमिटर धावण्यात रौप्यपदक, गार्गी मसुरकरने थाळीफेकमध्ये कांस्यपदक प्राप्त केले आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक डॉ. जयवंत माने, अक्षय कदम यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयासह सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच, या विद्यार्थ्यांचे केअर ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर आणि अध्यक्ष स्नेहल पालकर यांनी विशेष अभिनंदन केले.

## रणजीत शतक झळकावत गाठला मोठा टप्पा

# श्रेयस अय्यरने संपवला तीन वर्षांचा दुष्काळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
**रणजी करंडक स्पर्धेतील एलिट गट 'अ' मधील सामना मुंबई आणि महाराष्ट्र संघात खेळला जात आहे. या सामन्यात महाराष्ट्राने पहिल्या डावात १२६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईने सर्वबाद ४४१ धावा करत ३१५ धावांची आघाडी घेतली असून महाराष्ट्र संघाने दुसऱ्या डावात एक गडी गमावत १४२ धावा केल्या आहेत.**



### भारताचा अविभाज्य भाग

**मुंबईसाठी रणजी सामन्यांपासून दूर राहण्याचे कारण म्हणून अय्यरने पाठ आणि कंबरदुखीचे कारण सांगितले होते. परंतु, नितीन पटेल यांच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय वैद्यकीय पथकाला त्याच्या फिटनेसमध्ये कोणतीही समस्या आढळली नव्हती. अय्यर गेल्या वर्षी सर्व फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचा अविभाज्य भाग होता. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात त्याने चांगली कामगिरी केली होती, जिथे त्याने दोन शतके आणि तीन अर्धशतकांसह ४६८ धावा केल्या होत्या. मात्र, कसोटी सामन्यांमध्ये तो संघर्ष करत आहे.**

भारतीय कसोटी संघातून बाहेर असलेला मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरने शनिवारी (दि.१९) तीन वर्षानंतर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये शतक झळकावले आहे. त्याने मुंबई आणि महाराष्ट्र यांच्यातील दुसऱ्या फेरीतील रणजी करंडक सामन्यात तीन वर्षांनंतर प्रथम श्रेणीतील शतकाचा दुष्काळ संपवला. कर्णधार अजिंक्य रहाणे बाद झाल्यानंतर मुंबईसाठी पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अय्यरने युवा सलामीवीर फलंदाज आयुष म्हात्रेसह मुंबई संघाचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या दिवशी २०० धावांची भक्कम भागीदारी करत मुंबईला ३०० धावांच्या पुढे नेले.

श्रेयस अय्यरने १३१ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने शतक पूर्ण केले. शतकाने अय्यरचा दीर्घकाळचा दुष्काळ संपवला, जो २०२४ च्या सुरुवातीला घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यापासून भारताच्या कसोटी सेटअपमधून बाहेर आहे. २९ वर्षीय अय्यरने मागील प्रथम श्रेणीतील शतक नोव्हेंबर २०२१ मध्ये कानपूरमध्येन्यूझीलंडविरुद्धझळकावले होते. अय्यरने महाराष्ट्राविरुद्धच्या डावात ६ हजार प्रथम श्रेणी धावाही पूर्ण केल्या आहेत. आयुष म्हात्रे १७६ धावा करून बाद झाला.

## पाकिस्तानला मिळणार नवा कर्णधार

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**
सध्या पाकिस्तान संघ घरच्या मैदानावर इंग्लंडचे यजमानपदावर व्यस्त आहे. यामध्ये दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. मुलतानमध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले होते. मात्र, दुसऱ्या कसोटीत संघाने जोरदार पलटवार करत जबरदस्त विजय नोंदवला आणि मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. आता मात्र तिसऱ्या कसोटीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या मालिकेसोबतच पाकिस्तान संघासाठी पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्येही नव्या कर्णधाराचा शोध सुरू आहे. कारण बाबर आझमने अलीकडेच कर्णधारपद सोडण्याची घोषणा केली होती. आता अशी माहिती मिळत आहे की, यष्टिरक्षक-फलंदाज मोहम्मद रिझवान हा बाबरने सोडलेल्या पदावर विराजमान होण्याच्या शर्यतीत सर्वात प्रबळ दावेदार म्हणून समोर येत आहे. कारण बाबर आझमने नेतृत्वाखाली पाकिस्तानला फारसे यश मिळाले नाही. तसेच त्याने फलंदाजीतही निराशाजनक कामगिरी केली होती.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)